
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 9295

# लहरी



REFBK-0007838
REFBK-0007838

अशोक देव

ग्रंथ
ग्रं. नं.

कं २९०२
२२।५।४३

# ल ह री

अशोकदेवांच्या निवडक कविता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५८३८

संपादक :
ध्रुव देवदत्त टिळक बी.ए.

REFBK-0007838
REFBK-0007838

[ २९ : ५ : १९५२ ]

[ किंमत १॥ रुपया

**मुद्रक व प्रकाशक :** देवदत्त नारायण टिळक,
नागरिक छापखाना, शांतिसदन, नाशीक.

# प्रस्तावना

माझे बंधु श्री. अशोकदेव यांच्या कवितांचा संग्रह रसिकांच्या हातीं देतांना मला खरोखरच आनंद होत आहे. कवितासंग्रह प्रसिद्ध करा म्हणून मी कितीतरी दिवसांपासून त्यांच्या मागें लागलों होतों परंतु एक प्रकारच्या प्रसिद्धिपराङ्मुखतेमुळें त्यांनीं तिकडे फारसें लक्ष कधींच पुरविलें नाहीं. अखेर हें काम मला हातीं घ्यावें लागलें. आमच्या वडिलांनींहि हें हातीं घेण्याचा आग्रह करून उत्तेजन व साहाय्य हीं भरपूर दिलीं व त्यांच्यामुळेंच हा संग्रह आज प्रसिद्ध होत आहे.

अशोकदेव हे मोठे प्रख्यात कवि नसले तरी ते मराठी वाचकांस अगदींच अपरिचित आहेत असें नाहीं. दहा वर्षांपूर्वी त्यांची 'अशोकदेवी' वाचकांपुढें आली होती. तींत आठदहाच कविता असल्या तरी अनेक छोट्यामोठ्या रसिकांनीं तिची मुक्तकंठानें वाखाणणी केली होती.

दहा वर्षांपूर्वीचे अशोकदेव आणि आजचे अशोकदेव ह्यांच्यांत बराच फरक पडलेला दिसतो. काव्याची आवड तीच असली तरी कवितेकडे बघण्याच्या दृष्टिकोनांत फरक झालेला आहे. दहा वर्षांपूर्वी 'कलिकेला पुष्पपणा आला' नव्हता, व्यक्तित्वाच्या रेखा स्पष्ट झाल्या नव्हत्या; परंतु आपलें काव्य रसिकांपुढें यावें आणि त्यांनीं त्याचें कोडकौतुक करावें असें त्यांना वाटे.

वृक्षवराच्या आधाराविण शोभतील का लतिका ?

गुंजनाविना भृंगततींच्या उमलतील का कलिका ?

आणि

गाइल कवि का जरी न करितिल कोणी तत्कुतुकाला ?

असें त्यावेळीं त्यांनीं म्हटलें आहे. त्या काळीं काव्य त्यांच्या जीवनांत भिनून एकजीव झालेलें नव्हतें. ती त्यांची नुसती एक आवड होती, छंद होता. आज ही वृत्ति उरलेली नाहीं. काव्य हें आतां कवींच्या जीवनांत मिसळून जाऊन कवींच्या व्यक्तिमत्त्वाचा एक घटक बनलें आहे. ' कविता म्हणजे आपण घडविलेली एक कुसरीची जिन्नस ' ही भूमिका त्यामुळें सहजच नाहींशी होऊन ती इतरांपुढें मांडण्याची हौस आतां मावळली आहे.

त्यामुळेंच ते प्रथम हा संग्रह प्रसिद्ध करण्यास तयार नव्हते.' काव्य म्हणजे जीवनाच्या अनुभूतीचे पडसाद ; आणि इतर चार लोकांपेक्षां अपूर्व अशी कोणती अनुभूति आपल्या वांट्याला आली आहे ?' असें त्यांना वाटे. म्हणूनच मी ह्या संग्रहाची जुळवाजुळव करीत असतां त्यांनीं त्यांतल्या निम्म्याअर्ध्या भागास कात्री लाविली.

येथें संपादक म्हणूनच नव्हे तर अशोकदेवांच्या काव्याचा एक चाहता म्हणून त्यांच्या काव्याविषयीं चार शब्द लिहिल्यास तें अनुचित होणार नाहीं असें वाटतें. ' ज्वानीच्या अरुणोदयीं ' लिहिलेल्या त्यांच्या कविता वाचतां ध्यानांत येतें कीं कवि भांबावल्यासारखा झाला आहे. त्याच्या जिवास ' हुरहूर ' लागल्यासारखी झाली आहे. वास्तविक कोणत्याहि रम्य किंवा भव्य अनुभूतीनें कविहृदयाची अशीच स्थिति होत असते; परंतु येथें ध्यानांत घ्यावयाची गोष्ट ती ही कीं हा काळ स्वतः कवीच्याच नव्हे तर त्याच्या काव्याच्याहि तारुण्याचा अरुणो-

दय होता. त्यामुळें हा दरवळ आपल्या प्रस्फुटित होऊं पहाणाऱ्या काव्यकलिकेचाच आहे हें त्याला उमगत नाहीं. जिवाला 'तृषा' लागली आहे परंतु ती दयितेसाठीं नसून कवितेसाठीं आहे हें त्याच्या ध्यानांत येत नाहीं. "तृषा" कवितेच्या शेवटल्या दोन ओळी निसर्गतः फोंफावत जाणाऱ्या रोपट्यावर दुसरेंच कलम आणून बांधावें अशा भासतात त्या यामुळेंच. "हुरहूर" कवितेंतहि अमूर्त प्रेयसीची आळवणीच दिसून येते. "तारुण्य आणि बाल्य" ह्या कवितेंत तर कवि 'नको हें तारुण्य!' असें म्हणत आहे.

आजचें युग 'कवि आणि काव्य' ह्या विषयाचें नाहीं, तेव्हां त्या बाबतींतलीं त्यांचीं परिपक्व मतें कवितांतून प्रकट झालेलीं आढळत नाहींत. मात्र प्रीतिविषयक कल्पना, भावना, व दृष्टिकोन हीं वरीक आज बदललेलीं, पक्षीं परिपक्व झालेलीं दिसतात. प्रीति म्हणजे काय तें आज कवि आत्मप्रत्ययानें, अधिकारानें व अगदीं असंदिग्धतेनें सांगत आहे. त्याच्या मतें प्रीतिचें स्वरूप प्रणयचेष्टांपुरतें संकुचित नाहीं. चराचराला व्यापून उरणारी अशी ती एक महान् शक्ति आहे, आणि रमणीवल्लभांचें परस्पराकर्षण हा याच विराट् शक्तीचा एक खेळ आहे.

ही जगता प्रभुनें वैजयंति दिधलेली
ती गळां जयाच्या असे सदा रुळलेली
कळिकाळाचें भय नाहीं नाहीं त्याला
त्या विश्वेशाच्या धन्य लाडक्या बाळा

असें त्यांनीं आवेशानें प्रतिपादन केलें आहे.

प्रेमनाम जगदीश, फुला रे, काय आणखी सांगूं?

अशासारख्या रे. टिळकांच्या उक्तींचा व बायबलच्या प्रीतिविषयक शिकवणीचा त्यांच्या मनावर नकळत ठसा उमटला असावा.

प्रीतीच्या ठायीं केवढें सामर्थ्य आहे ह्याविषयींची आपली कल्पना त्यांनीं " खऱ्या प्रीतीची खरी हीच रीति " या कवितेंत मांडलेली आहे; आणि जगांत परमेश्वरानें प्रीतीची योजना केली तिचें प्रयोजन काय ह्या प्रश्नाचेंहि उत्तर —

हें प्रेमरसायन जगदीशें निर्मालें
जोडण्या जगाचे खंड खंड झालेले

असें दिलें आहे. एवढेंच नव्हे तर पुढें—

ही प्रीतिदेवता अखिल जगाची धर्त्री
त्याचीच मूर्ति ती सुखदुःखांची कर्त्री

असें म्हटलें आहे.

' मज माझी भार्या देई । कीं माता भगिनी दुहिता ' ही रे. टिळकांची कल्पना अशोकदेवांनीं अधिक काव्यात्मतेनें व सहृदयतेनें उकलून दाखविली आहे. "कधीं ग येशिल–" ही त्यांची कविता म्हणजे उदात्त प्रीतिभावनेनें ओथंबलेल्या अंतःकरणाचें स्पंदनच होय. विरहांतरित प्रियेचीं शृंगारिक वर्णनें न करतां किंवा तिच्या क्रीडा-चेष्टा मनांत घोळवीत न बसतां कवि तिची वत्सल वृत्ति आठवीत आहे. दयिता ' दायिता ' न रहातां ' अनंत काळच्या माते'च्या उच्च भूमिकेवर गेलेली आहे.

तीच तूझी आई वल्लभा तीच रे

ह्या एकाच ओळींत त्यांच्या स्त्रीविषयक उदात्त कल्पनांचें सार आलें आहे.

पुरुषाच्या सर्व बाजूंनीं उफाळणाऱ्या आकांक्षांना सर्व प्रकारें सांवरून धरणाऱ्या स्त्रीत्वाचें सम्यक् दर्शन " माया " ह्या कवितेंत घडविलेलें आहे. पुरुषाला स्त्रीची आवश्यकता आहे ती केवळ वासनापूर्तीसाठींच नव्हे. त्याच्या जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्यें ती त्याची सहचारिणी, रास्त अर्थानें अर्धांगी असते. स्त्रीला

' माया ' म्हणायचें खरें परंतु त्या मायेचें स्वरूप कोणतें तें कवीनें येथें दाखविलें आहे. त्याची माया नुसती 'मोहमयी' नसून 'तप्त जिवाला शांति देणारी स्नेहमयी', 'त्याच्या प्रणयाचें स्वागत करणारी प्रेममयी' व त्याच्यासाठीं 'निज तन, निज मन, वाचा, काया पायीं वाहून त्याला धन्य करणारी' व त्याची धन्यता पाहून ' स्वयें तृप्त होणारी त्यागमयी माया ' होय.

"स्त्री" ही कविता नवयौवनांतून परिपक्वतेकडे संक्रमण करीत असतां कवीनें लिहिलेली आहे. 'मानव व त्याची प्रीतिभावना' या भूमिकेवरून ही कविता लिहिलेली नसून तींत ' काव्य व प्रीति ह्यांचा अन्योन्यसंबंध ' दाखविला आहे. क्षणांत माता, क्षणांत सुता, क्षणभर भगिनी, क्षणीं कामिनी, क्षणभर देवता होणारेंच स्त्रीहृदय कविहृदयास भुरळ घालूं शकतें असें कवीचें म्हणणें आहे. पुढें हीच कल्पना अधिक परिणत होत जाऊन ' कविहृदय व अशी विशिष्ट स्त्री ' ही भूमिका न रहातां ' अखिल स्त्रीजाति व पुरुषजाति ' या भूमिकेवरून लिहिलेल्या कवितांनीं तिची जागा घेतली आहे.

अशोकदेवांच्या काव्यांत कल्पकतेपेक्षां भावनेला अधिक प्राधान्य आहे.तरीपण कल्पकता त्यांच्या काव्यांत नाहींच असें मात्र नाहीं. ' रोमांचांचीं आभरणें ' व ' घर्मबिंदूंची मुंडावळ ' या कल्पना रमणीय आहेत. वरवर शुष्क भासणाऱ्या कवीच्या हृदयांतून स्फुरणाऱ्या स्फुरणांस, खडक फोडल्यावर त्यांतून उसळणाऱ्या झऱ्याची उपमा, निष्फळ झालेल्या आशांवर गळणाऱ्या पिकल्या पानांचें रूपक, प्रीतीचें सामर्थ्य वर्णन करतांना स्वातीच्या जलबिंदूंना 'अब्धिशुक्तिपुटकीं' धारा मिळून त्यांची 'नेटकीं मोत्यें' बनतात या जुन्या संकेताचा केलेला उपयोग, व पृथ्वीचा अंत चंद्राशीं टक्कर होऊन होईल ह्या भाकितास त्यांनीं दिलेला काव्यमय मुलामा हीं हृद्य आहेत; तर "गे नवल पाहिलें–" ह्या कवितेंतील दयितेच्या

अंतःसृष्टीचें वर्णन करतांना त्यांच्या कल्पकतेनें घेतलेली पल्लेदार झेंप जितकी रमणीय तितकीच भव्योदात्तहि आहे.

तरीपण एकंदरींत कल्पकतेच्या आहारीं जाऊन भावनेची पायमल्ली करण्याचें पाप त्यांनीं कोठेंहि केलेलें नाहीं.

अशोकदेवांच्या ठायीं एक प्रकारची आस्तिक्यबुद्धि आहे. मात्र ती भक्तिभावना नव्हे. त्यांतल्या त्यांत आपत्काळींच परमेश्वराला आठवण्याची व आळविण्याची Negative भक्ति त्यांच्यापाशीं नाहींच. उलट भव्यता दिव्यता उदात्तता कशांतहि दिसली कीं तेथेंच त्यांच्या प्रतिभेला परमेश्वराचा आदळ होतो; आणि अशी 'दिव्यत्वाची प्रचीती' जेथें जेथें येते तेथें तेथें त्यांचे 'कर जुळल्या' वांचून राहात नाहींत. "प्रीति" कवितेंत प्रीतीची व्याख्या करतांना त्यांनीं तिला 'प्रभूची देणगी' म्हटलें आहे. "कधीं ग येशील–" कवितेंतलि वात्सल्यमूर्ति आई, वल्लभेच्या प्रीतीची दिव्यता वर्णन करतांना, 'देवाजीच्या दये'चीच आठवण करते. 'दयितेचा विरह असह्य झाला. प्रभो आतां तूंच धांव.' असें कांहीं कवि त्या कवितेंत म्हणत नाहीं. ह्याचें कारण वर सांगितलेंच आहे. भक्तांसाठीं धांवून येणाऱ्या परमेश्वरापेक्षां 'करांगुलिस्पर्शानें प्रचंड तेजोगोल फिरविणाऱ्या प्रभुजी'ची 'अतर्क्य लीला'च कवीला अधिक रुचते.

संकटें आलीं तर त्यांना पाठ दाखवून पळायचें नाहीं, 'देवावर भार घालूनीया' स्वस्थ राहायचें नाहीं, किंवा त्या संकटांशीं व्यर्थ तंडतहि बसायचें नाहीं तर 'दावून वांकुल्या' त्यांची वासलात लावून टाकायची. हा त्यांचा स्वभाव "किति खुळी सखे तूं" या काव्यांत प्रकट झाला आहे. विपत्काळींच परमेश्वराच्या नांवानें टाहो फोडण्याची त्यांची वृत्ति नाहीं असें जें मीं म्हटलें त्याच्याशीं हें सुसंगतच आहे.

कांहीं कवितांतून त्यांच्या विनोदाचें व उपरोधाचें दर्शन होतें. "देवाच्या राज्याचे वतनदार" यांतील उपरोध जितका कठोर व बोंचक आहे तितकाच 'पोपटमैना' काव्यांतील उपहास खोडकर व खेळकर आहे. संत तुलसीदासांत 'सखया,सजणा,राया, मनिं वसंत सुंदर फुल्ला' असें एक गीत होतें. त्याला 'सत्वरिं झडकरिं लौकरिं या' ही कोपरखळी आहे, तर विद्वान्, सुसंस्कृत परंतु जात्याच उच्छृंखळ अशा पुरुषहृदयावर "विधु उभयांवरतीं अमृतधोत उधळील" या कवितेंत अंकुश चालविलेला आहे. या अंकुशाची बोंच ज्याची त्यालाच जाणवावी आणि इतरांस फक्त एक सुंदर काव्य येवढा मात्र बोध व्हावा, अशी ह्या कवितेची योजना आहे.

"खबरदार" ही कविता सकृद्दर्शनीं विनोदी वाटत असली तरी वस्तुतः ती तशी नाहीं. मनुष्याचें मन, विशेषतः तरुण पुरुषाच्या उच्छृंखळ मनोवृत्ति बरोबर जाणून घेऊन स्त्रीवर्गास ही धोक्याच्या सूचनेची कडू गोळी काव्यावगुंठित करून दिलेली आहे.ह्याउलट "राणसाहेबांस अर्जी" करतांना त्यांनीं कवितेस थट्टेथट्टेनें उर्दू 'नकाब' दिला आहे. उर्दू वल्लभाच्या लाचारीचा आविर्भाव उर्दू शब्द पेरून च तीच वृत्ति पांघरून बेमालूम उठविला आहे. कवितेला विषय अगदीं सामान्य घेतल्यानें व अस्सलाबरोबरच अपभ्रष्टहि उर्दू शब्द घातल्यानें कवितेमागचा मिस्कीलपणा मोठा मजेदार दिसतो.

"इल्लिल्ला" गातांना कवीकडे सामान्य पण थोड्याफार व्यवहारी माणसाची भूमिका आहे. काव्यांत सामान्य माणसाच्या गाऱ्हाण्यांखेरीज आणखी कांहींच नाहीं,पण तें त्यांनीं अगदीं उघडउघड रीतीनें मांडलें आहे इतकेंच.सर्वत्र नकारघंटा वाजते आहे शेवटीं Fools rush in where angels fear to tread ह्या उक्तीचा अवलंब करण्याइतपत मूर्खपणाचाहि आपल्या ठायीं ठण-

ठणाटच आहे असेंहि सांगून टाकलें आहे.

सर्व सोडून ध्येयामागें धांवत सुटणाऱ्या 'वेड्या'ची भूमिका एखाद्यालाच उमगते आणि ती उमगूनहि लोकांच्या भयामुळें त्याची साथ करणें त्याच्यानें होत नाहीं. हा सार्वत्रिक अनुभव "वेडा" या कवितेंत ग्रथित केलेला दिसतो.

"नाटकां"तील विनोद अगदीं सामान्य प्रसंगावर आधारलेला असला तरी त्यांतलि छोटीं छोटीं व्यक्तिचित्रें कौशल्यपूर्ण आहेत. मात्र कधीं कधीं वाहावत जाऊन विनोदाचा अतिरेक-पक्षीं पाचकळपणाच झाला आहे असें म्हणावें लागतें.

अशोकदेवांच्या काव्याचें जें आणखी एक अंग मला स्वतःला विशेष वाटतें तें म्हणजे त्याचें बाह्यांग. त्यांची वाणी प्रसादपूर्ण आहे. जुनें बखरवाङ्मय, संस्कृत वाङ्मय, तसेंच उर्दू वाङ्मय ह्यांच्याशीं परिचय असल्यानें त्यांना शब्दांची व शब्दरचनांची सहसा वाण पडत नाहीं. आणि मनांतल्या लहरींचें-उंच उंच उसळ्या घेणाऱ्या ऊर्मींचें, तसेंच प्रसंगीं उठणाऱ्या नाजुक तरंगांचें-यथातथ्य दर्शन ते सारखेच लीलया घडवितात. त्यांची श्लोकात्मक रचना अगदीं थोडीच आहे. परंतु आहे ती संथ, ओघवती व डौलदार आहे. ओवी, पादाकुलक, व मुक्तच्छंद यांच्या युगांत "हुरहूर" मधील प्रसन्न श्लोकरचनेचा रुचिपालट रसिकांना रुचेल असें मला वाटतें.

अशोकदेवांच्या कांहीं थोड्या कविता भाषांतरित आहेत. परकीय भाषेंतील एखादी कविता आवडल्यास टीकाकार तिचें रसग्रहण करून आपलें कौतुक व्यक्त करतो; तर तेंच अशोकदेवांसारखा कवि तिचें भाषांतर करून व्यक्त करतो. या छोट्या दालनांतलि एकच कविता "मी ही मम नाहीं उरलें" वानगीदाखल येथें दिली आहे.

ही लांबलेली प्रस्तावना पुरी करण्यापूर्वी 'लहरी' या नांवाचें थोडक्यांत स्पष्टीकरण केल्यास तें अस्थानीं होईल असें वाटत नाहीं. अशोकदेव आपल्या कवितांना 'लहरी' म्हणतात. ते एखाद्या विशिष्ट राजकीय पक्षाचे, धर्मसंप्रदायाचे, किंवा तत्त्वप्रणालींचे पक्षपाती नाहींत. निरनिराळ्या क्षणिक मनःस्थितींचें त्यांनीं काव्यरुपानें रेकार्ड करुन ठेविलेलें आहे. कवीनें एकदा "मी ही मम नाहीं उरलें" म्हटलें म्हणून त्याला कांहीं रेवरेंड पदवी द्यायची नाहीं; "आनंद आनंद" लिहिला म्हणून त्याला पंढरीचा पाईक बनवायचें नाहीं; "कधीं येशील–" अशी आधिव्याधींची आराधना केली म्हणून कांहीं त्याला संन्यास द्यायचा नाहीं, "एदन बागे"चें भविष्य वर्तविण्याचा आव आणला म्हणून त्याला द्रष्टा म्हणायचें नाहीं; किंवा "देवाच्या राज्याच्या वतनदारां"च्या ढोंगीपणावर प्रहार केला म्हणून त्याला क्रांतिकारक बनवून फांशींहि द्यायचें नाहीं. आणि मुख्य म्हणजे कवीच्या मनांत ज्या वेगवेगळया 'लहरी' वेगवेगळ्या प्रसंगीं उठल्या त्याच त्यानें चित्रित केल्या हें विसरायचें नाहीं. जीवनाच्या धकाधकीच्या व धांवपळीच्या मामल्यांत क्षणभर रिकामपण सांपडलें असतां, सांवलीला बसून आपली 'काव्य-चिलीम' शिलगावावी व येणाऱ्याजाणाऱ्या 'पाव्हन्यां'नाहि चार झुरके घेण्यास अगत्यानें पाचारावें असा हा प्रकार आहे.

**ध्रुव देवदत्त टिळक**

मी नको नको करीत असतांनाहि माझ्या ज्या चाहत्यांनीं मला आपणांपुढें आणून उभें केलें आहे, त्यांचा आभारपूर्वक निर्देश केल्यावांचून राहवत नाहीं.

चि. ध्रुव याचा वांटा यांत सगळ्यांत मोठा आहे. आमचे वडील श्री. दे. ना. टिळक यांच्या उत्तेजनाच्या व आधाराच्या अभावीं हें काम झालें नसतें. तसेच माझे गुरू प्रो. अण्णासाहेब आंबेकर यांचें प्रोत्साहन व माझी एक विद्यार्थिनी कु. सुमन आहेर हिचें टीपा तयार करतांना झालेलें अमोल साहाय्य हीं मला विसरतां यायचीं नाहींत.

मला पुढें ढकलणारी मंडळी ही असली तरी मला पुनःपुनः कवितालेखनाच्या भरीस घालणारी दुसरीहि एक व्यक्ति आहे. मात्र तिचा येथें नामनिर्देश केला तर तें तिला —व मलाहि प्रशस्त वाटायचें नाहीं.

अरविन्दाच्या स्मृतीस

सं. क्र. १२९८

# जीवन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५८३८

क्षण प्रीतीचा
क्षण भीतीचा
क्षण सौख्याचा
क्षण दुःखाचा
क्षणाक्षणांचा हार गुंफिला
'जीवन' म्हणती त्याला

# ही प्रगतिपथावर शिंपिल एकच परि तेजाचा बिंदु

तीं चंद्रांशूचीं उज्ज्वल किरणें तम हरिती जगताचा
जरि मार्ग दाविती अखिला जगता — ध्येयाचा प्रगतीचा
हा पूर्ण चंद्रमा रातभरी जरि तेज पसरितो गगनीं
नीलांबरपट जरिं होइ सुशोभित नव नव नक्षत्रांनीं

अवनीवर या तर ठायीं ठायीं सानथोर दीपांहीं
मांडिली रोशनी निजदीप्तीची उधळीली नवलाई
परि असेल कोठें एक कोंपरा — दाट जिथें अंधार
कुणि असेल तेथें निराश आकुल चिंतेनें अनिवार

ही तया द्यावया धीर, दाविण्या वाट तया प्रगतीची
लाविली सानुली पणती सानच प्रभा तिच्या ज्योतीची
हे भुवन उजळण्या जरी ठाकले सज्ज दीप्तिचे सिंधु
ही प्रगतिपथावर शिंपिल एकच परि तेजाचा बिंदु

# इल्लिल्ला

कुणि जगदुद्धारास्तव जगती
यश-जय-वैभव कुणा लाभती
कुणि मोत्यांचा चारा खाती
आम्ही इल्लिल्ला

खेळाडू कुणि मिळवी नांवा
कुणि मिरवी निजबुद्धिवैभवा
कुणि वक्ता वा कवी कुणी वा
आम्ही इल्लिल्ला

कुणास लक्ष्मी प्रसन्न होई
कुणा सरस्वति अंकीं घेई
कीर्ति कुणाला धुंडित येई
आम्हां इल्लिल्ला

प्रसिद्धिसाठीं विचित्र नर्तन
जें करवी जागीं रासभरोहण
अंतिं तें तरी देइ मूर्खपण
तेंही इल्लिल्ला!

# तृषा

रातराणिचा सुगंध मधुतर भवतिं दाटला घरोंघरीं
शीतल सुखमय प्रसन्न मारुत खेळे भुवनीं मृदुलहरी
पुलकित करि तनु स्पर्श तयाचा दे विश्रांती सकल जनां
उडुगण हसतो अहा सुखवितो अखिल जगाला तेविं मना

पळें पळें हीं विश्रांतींचीं सुरुचिर रत्नें मोलाचीं
कीं सुमनें हीं कालतरूचीं आवडतीं बहु रजनीचीं
हीं आभरणें लेउन नटली रजनी आली धरेवरी
पाहुन अनुपम तेज तयांचें दंग जाहली सृष्टि खरी

जगत गुंगलें मूढ जाहलें पहा विसरलें स्वत्वाला
एक मोहनी पसरे भुवनीं निद्रा म्हणती जन तिजला
निद्रेमाजीं विश्व रंगलें एक अभागी परि उरला
झोप न त्याला तृषा लागली असह्य झाली हृदयाला

येशिल केव्हां, गाशिल गीतें, झोंका हृदया देशील
निवेल कधिं हा तव उच्छ्वासें मनीं पेटला सखि अनल

# हांक

एकलाच येथें आलों
एकलाच मी जाईन
परी आज तृषा लागे
साथ देईल का कोण

धांव घेई सखे आतां
जीव झालासे तान्हेला
घालीं हळूच फुंकर
दाह चित्ताचा चालला

चालतांना आयुष्याची
घोर कष्टमय वाट
धीर येईल जिवाला
हातीं घेतां तुझा हात

चिंता दुःख यांची रात
तम दाटे नैराश्याचा
दावील गे तुझी ज्योत
एक किरण आशेचा

# हांक

संसृतीच्या वाळवंटीं
जलसेक आसवांचा
शिंपुनीया फुलवीं गे
फळाफुलांचा बगीचा

कल्पनेच्या कुंचलीनें
रंग भावनांचे भरीं
काढ चित्र राणी माझ्या
अंतरींच्या पटावरीं

# हुरहूर

एक सुप्ताशा कधींची मनींची
जागृती परि तिज आज येइ साची
नटवि ह्रदया मम दिव्य वैभवानें
हसवि मजला निज हास्यमाधुरीनें

क्षणभर हसली ती मन्मना हासवाया
क्षण भर मम मतिची खिन्नता दूरवाया
अवचित परि गेली हाय कोठें कळेना
ह्रदयिं तिमिर दाटे-मार्ग हा ! आकळेना

दिवसरजनि गेल्या एकमेकानुसारी
अवनि नविन ल्याली भूषणें हर्षकारी
प्रणयिनि अवनीला भेटण्या कांत आला
म्हणुन नवलपरिचा साजश्रृंगार केला

बघुनि प्रणयलीला माधवाच्या धरेच्या
सकल जगत धालें वर्णवें केविं वाचा
परि मम ह्रदयीं जी अंधिका दाट दाटे
पळहि मज न देई शांति; दे क्लेश मोठे

# हुरहूर

पवन भव्यतर पादप हालवी
सरल भाव मनिंचें जणुं सत्कवी
श्रवाणिं ये कुठुन नाद गभीर हा
अशुचिची करण्या जणुं व्यापहा

नविन पल्लवित वल्लरि डोलती
तरुवरां विलगुनी मृदु हासती
बघुनि ती सुषमा नच नाचती
पशु तयास गणिती जरि सन्मति

मृदुलता मनिंची परि लोपली
तरलता मतिची परि कोपली
रसिकता हृदिंची मम आटली
मन निवेल कसें मग या स्थळीं !

विसरतों तव चिंतनिं भिन्नता
निरखितों तव दर्शनिं चारुता
क्षणिंच येइ पुन्हा परि जागृती
तयिं मदीय बघुनी कुढतों स्थिति

# आशेची झुळूक

जिवाची काहिली क्षण नाहीं चैन
जाळते चित्ताला चिंता गे दारुण
'काल' गेली कुठें तिची खंत वाटे
येईल जी 'उद्या' भय तिचें दाटे
सुचेना गे वाट भाजतीं पाऊलें
छाया नाहीं कोठें रण हें तापलें
गळे अवसान झांपडी दृष्टीला
उचलेना पाय देह हा कष्टला
टेकतां तेथेंच झांकले नयन
कुडी पडे येथें गेलें देहभान !

लाडानें लाडकी हळूच विलगे
आशेची झुळूक लागली काना गे
"उघडीं एकदा नयन खुल्या हे
पाहीं भोंवतालीं काय खुलताहे !"
हासरी चंद्रिका व्यापी अवकाशा
अल्लड आनंदें भरी दिशादिशा
रण तेंच घोर परि शांत भासे
तीच तप्त रेंव मंद मंद हासे
वाट जरी नाहीं ठाउकी अजून
दुबळ्या देहा या ओढी पुढें मन

# वादळ उठलें अंतर्यामीं

वादळ उठलें अंतर्यामीं सुचे न एक उपाय
येतिल बाहिर ऊर्मि उसळत्या फोडुन आतां काय !

मार्गदर्शिका तारा लपवी स्वमुखा काळोखांत
तारुं जिवाचें कुठें भडकलें खळबळत्या दर्यांत

शील-सुकाणूं सांवरीत सद्विवेक धरुनी धीर
खडक चुकवितां व्यामोहाचें पुरतां झाला जेर

नक्र भयानक विषय मोह हे घेती भवतीं घिरट्या
जबडे वासुन भयकर दाविती निज जिव्हा लळलळत्या

'दाविल वदना जरी-' नाखवा अजुन वदे विश्वास
'पळभर तारा, तरी तारवा आवरीन या खास !'

# स्त्री

क्षणांत होशिल माता मम गे
क्षणांत माझी सुता
क्षणभर भगिनी क्षणीं कामिनी
क्षणभर मम देवता

पळभर तुझिया दिसेल नयनीं खळखळतें वात्सल्य खरें
मन्मन आकुळ नैराश्यें जरि हसेल खुद्कन मोदभरें

जाइल विझुनी सारी चिंता सदा मन्मना जी जाळी
झुळझुळ निर्झर वाहिल जेव्हां प्रेमाश्रूंचा मृदुलहरी

तप्त करिल जयिं मना उन्हाळा या संसारीं क्लेशांचा
तायिं दयिते तव वाहिल शीतल अनिल लाडक्या हास्याचा

डुलेल मानस, उलेल अंतर, स्फुरणें येतिल नवीं नवीं
शुष्क भंगतां खडक त्यांतुनी सलील सलिलें उसळावीं

जाइल भुलुनी क्षणभर बाले, मन्मन प्रौढपणास झणी
जयीं रोहिणी पुनश्च होशिल हसशिल रडशिल क्षणोक्षणीं

मुग्ध चारुता कधिं चर्येवर कधिं विलसे सव्याज हसें
कधिं नयनें तव बोल बोलती, ओष्ठद्वय जरि शांत दिसे

चंद्र हासरा तव वदनाचा शीतल कांती पसरील
मुग्ध मानसीं भाव-कल्पना कमल-कुमुदिनी फुलतील

पुलकित हृदयें दोन्ही पळभर परस्परांना भिडतील
हळूच जुळतिल अधर अधिरसे दूर लाजुनी सरतील

# गे नवल पाहिलें

गे नवल पाहिलें आज लाडके तुला सांगतों ऐक
चल एकवार सखि हृदय आपुलें उघडुन निरखुन देख
हर्षोत्सव नव तव हृदयमंदिरीं संतत चाले राणी
परि दाद न त्याची तुला लागली कैशी नकळे अजुनी

सद्भाव वाजवी मृदंग धुङ् धुङ् गुंगुनि त्यांतच नाचे
हें गान चाललें कुणा सुखविण्या अविरत आनंदाचें
बघ अष्टकन्यका त्याच्या नर्तनिं रमल्या नटुनी छान
सद्वृत्ती या तव मोहित झाल्या सांग कुणाला बघुन

सिंहासनिं बघ ना कोण लाडका बसला हसरा राजा
या बनुनी दासी कुणा सेविती आशाकांक्षा तूझ्या
आर्जवें आळवुनि कुणा सुभाग्या पहा विनविती–'राया
तुज आण जिवाची रहा निरंतर येथें सन्निध अमुच्या!"

तव इच्छावाञ्छा गुंग सारख्या स्वनीं त्याच गे होती
जें गान घुमविती विनाध्वनी मध्यमा–परा–पश्यंती
अंतर्मुख होउनि तूंहि ऐक ना सखि अनुपम संगीत
म्हणि वैखरीहि तव निजभगिनींना देइल नकळत साथ

गे नवल देख हें नयनांपुढतीं मम संतत तो डोले
कल्लोल माझिया प्रतिमेभवतीं तव अंतरिं तो चाले
जरि एकदाच निज बघशील राणी अंतरंगरंगातें
तरि तोडुनि सारे बंद तेथले येशिल धांवत येथें!

# तारुण्य आणि बाल्य

कुणि येइल का उचलुन मज घ्यायाला
वात्सल्यें चुंबायाला
कुणि सारिल का दूर वर्तमानाला
मज बाल्यीं रमवायाला
चिउकाऊ हे बागडती
हीं सुमें भोवतीं खुलतीं
परि "प्रौढ" जाहलीं गमतीं
हीं नच आतां खेळ खेळती मजशीं
बाल्यांत खेळलीं जैशी !

नवमधुरतया सृष्टिसुंदरी नटली
परि भासे मजवर रुसली !
ही जगती ज्या तारुण्याला स्तविती
त्यापायीं मम ही कुगति
मम जुने मित्र जीवाचे
ते परके झाले कैचे
यौवन हें ऐसें जांचे
हें काळानें दिधलें ओझें पाठीं
काळाची धन्य रहाटी

## तारुण्य आणि बाल्य

जरि कुणि असला स्वामि तिन्ही जगतांचा
त्या विनविन तन-मन-वाचा
मज विसरूं दे प्रौढ जगत हें सारें
स्वार्थाचें मात्र पसारे

ही वेळा तारुण्याची
जरि तुष्टी प्रणयाशांची
सार्थताच आयुष्याची

ती नको मला ! पुन्हा परतुं दे मजला
अव्याज बालजगताला

# माया

अवकाशाला भरुन उरावें ईर्ष्या ही घेउनी
जवें निघाला आवेगानें सोडुनिया धरणी
हृदयीं अपुल्या त्यास दावुनी त्याची पडछाया
प्राणहंस मम बद्ध करी परि मोहमयी माया

जवळ घेउनी गोंजारी त्या प्रेमभरें बाला
कवळ भरविते निज अश्रूंच्या मोत्यांचे त्याला
गीत प्रीतिचें गाई, धरिते करुणेची छाया
तप्त जिवा त्या क्षण दे शांती स्नेहमयी माया

आभरणें मग रोमांचांचीं झणि नवविध ल्याली
घर्मबिंदुंची झणी बांधली मुंडावळ भाळीं
करिते निज नयनांच्या ज्योती उज्ज्वल उजळुनिया
स्वागत त्याच्या प्रणयाचें तैं प्रेममयी माया

आकांक्षा ज्या जपुन राखिल्या जीवाहुन भारी
त्यांसह ध्येयें अपुलीं सत्वर दे सांडुन सारीं
निज धन, निज मन, वाचा, काया पायीं वाहुनिया
धन्य करी त्या तृप्त स्वयें हो त्यागमयी माया

# किति खुळी सखे तूं

किति खुळी सखे तूं खरेंच तुजला गमलें
जें परिहासानें नाट्य सहज मीं केलें
का खोड जित्याची कळली अजुनी नाहीं
मानसीं बुडुनि मम कोरडाच खग राही

गे खूब हसावें दिनभर तुज हसवावें
क्रीडा–चेष्टा–परिहासीं मन रिझवावें
मज देसि नांव कधिं 'नटखट' जें थट्टेनें
तें खरें कराया झटतों बघ हट्टानें

संकट–दुःखें जीं येती नित मार्गांत
दावून वांकुल्या हांकलितों निमिषांत
मज नसतें दिधलें ईशें हें वरदान
तरि कैसा उरतों सांग सलामत अजुन

हो एकरूप मजसवें सोड शंका या
लाधेल तुला ही सुखदा हसरी किमया

# प्रीति

यौवनें बहरली हृदयींची वनराई
तो अनंगसौरभ भरी दिशा गे दाही
करिणीसम झुलसी उन्मादें तूं मत्त
मी तुला सांगतों नाहीं सखि ही प्रीत

लुटण्यास जगाची दोन घडीची मौज
हें घेसि निवडुनी एक बाहुलें आज
उधळिसी तयावर रास फुलांची फुलती
मी तुला सांगतों नाहीं सखि ही प्रीति

विभ्रमीं गुंगुनी रंग रंग उधळावे
गे प्याले भरुनी उन्मादाचे प्यावे
परि हांक हृदींची कानीं जरि ना येत
मी तुला सांगतों नाहीं प्रीती तेथ

क्षण आवेगानें कवळावें हृदयाशीं
चुंबनालिंगनीं विसरावें जगतासी
परि नाहीं जुळलीं अंतःकरणें जेथ
मी तुला सांगतों नाहीं प्रीती तेथ

तव रूप नको मज, यौवन तूझें नलगे
त्या क्रीडाचेष्टा नको मला दावूं गे
मम तृषा जिवाची कशी तुला उमगावी
मज प्रीत हवी जी तीच तुला नच ठावी

## प्रीति

ती प्रीत नसे गे तारुण्याची क्रीडा
ती प्रीत नसे गे त्या मदनाची पीडा
ती प्रीत नसे गे भारुड शृंगाराचें
ती प्रीत नसे गे गारुड उन्मादाचें

त्या जगन्नायकें जगावरी खैरात
गे मुक्तकरांहीं उधळीली बरसात
ती नाहीं केवळ प्रणयोन्मादासाठीं
ती नाहीं केवळ रूप-यौवनापाठी

ही जगता प्रभुनें वैजयंति दिधलेली
ती गळां जयाच्या असे सदा रुळलेली
कळिकाळाचें भय नाहीं नाहीं त्याला
त्या विश्वेशाच्या धन्य लाडक्या बाळा

हें प्रेम-रसायन जगदीशें निर्मिलें
जोडण्या जगाचे खंड खंड झालेले
ही प्रीतिदेवता अखिल जगाची धर्त्री
त्याचीच मूर्ति ती सुखदुःखांची कर्त्री

उघडीं नयनां, घे दर्शन हीचें राणी
हें रूप मनोहर घे घे हृदयीं भरुनी
मी तुला सांगतों येइल मग अनुभूति
बघशील तिथें तुज दिसेल प्रीति प्रीति

# कधीं ग येशील—

कधीं ग येशील जवळी घेशील
प्रीतीच्या आश्रूंनीं मज न्हाणशील
जाऊं दे धुवून विकल्प मनाचा
वर्षूं दे वर्षाव विशुद्ध प्रेमाचा

तडपला भारी जिव हा तान्हेला
पिऊं दे आकंठ प्रेमामृत त्याला
शिणलें मन्मन शिणली ही काया
देई ग आसरा विश्रांती घ्यावया

टेकूं दे तुझिया अंकावरी डोई
गोंजारीं प्रेमानें गाई ग अंगाई
जाईन भुलून जागल्या जगाला
जमतील भोंतीं बाहुल्या साउल्या

माथ्यावर हात ठेव क्षणभरी
पाहीन स्वप्नांत आई आली घरीं
"आई आई माझे कां ग वासराला
गेलीस सोडून भुकेल्या तान्हेल्या?"
दोघांच्या नयनीं वहातील आसू
अधरीं दोघांच्या उमटेल हासूं

# कधीं ग येशील

बिलगून प्रेमें विनवीन तिला
"नको ग माऊली दूर लोटूं मला
जाशील तिकडे संगें मी येईन
स्वर्ग वा नरक सारखा साहीन
नको नको मोडूं बाळपं बाळाचं
नको नको तोडूं पय पाडसाचं!"

हासून म्हणेल "वेडं पोर वेडं
नाहीं का देवानें दिली तुला जोड!
तीच तुझी आई वल्लभा तीच रे
सर्वस्व त्वदीय तिच्यांत संचरे
सांभाळीं तिजला लावीं तिला माया
देवाजीची खरी तुजवर दया!"
बोलतां बोलतां वात्सल्यें हासून
सत्प्रेममूर्ति ती जाईल विरून
येईल जागृती डोळे उघडीन
दिसेल पुढतीं मूर्त माया धन्य
तुझिया लोचनीं वात्सल्य आईचें
येईल प्रत्यय पुरेपूर सांचें!

# राणीसाहेबांस अर्जी

एकदा दिला शब्द काय विसराल —
गरिबाची ठेवुन ख्याल !

विसरा जरि झाला कुसुर
फर्मान करा सरकार
कुर्बान जान करणार
हाजिर बंदा हुक्म जरी होईल —
तळहातीं शिर घेईल !

का वरला बघतां झोंक
नाचीस जरी पाईक
तरी बाणी याची नेक
जरि इतुकीशी नफ़री मानुनि घ्याल —
बंदा न पडो बेदखल !

धरुं नका कडक अशि मर्जी
बघुं नका च प्यादा फर्जी
गरिबाची ऐका अर्जी
हा खेळ असा मांडुं नका बेताल —
येऊं द्या जल्द मिसाल !

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

# प्रीतिलता

ही सदा वार्धिनी राहिल फुलती प्रीतिलता सुकुमार
जरि येतिल जातिल सुखदु:खांचीं वात्याचक्रें थोर

दु:खभारें म्लान होई
येइ झळ जैं तापदायी
परि वरिल्या वृक्षा रक्षिल संतत ताप साहुनी घोर
ही सदा वार्धिनी राहिल फुलती प्रीतिलता सुकुमार

दु:सहा वा आपदांची
होई वृष्टी जरि हिमाची
निज तरुभवतींचें परि आलिंगन शिथिल न कार्धि होणार
ही सदा वार्धिनी राहिल फुलती प्रीतिलता सुकुमार

कितिक भरलीं पूर्ण हर्षें
कितिक पीडापूर्ण वरुषें
ही नाजुक लतिका निजवृक्षाला हासत नेइल पार
ही सदा वार्धिनी राहिल फुलती प्रीतिलता सुकुमार

# तरंग

पिंजऱ्यामधें माझिया मुदा बसलेलें
बोलतें सुखानें जें जें मीं पढवीलें
तें काय आज परि पुनरपि जाई उडुनी
पांखरूं लाडकें, पुन्हां न ये परतूनी

ठाकला पुढें आ वासुनि दर्या घोर
एकाकी जाणें त्यास भेदुनी पार
भयचकित मती हो उठे मनीं काहूर
होतीस हवी तूं सन्निध द्याया धीर

होतीस इथें तैं नकळे लवही कैचा
महिमा तव सखये अखंड सान्निध्याचा
पळभर जातां तूं घर उठतें खाया गे
करि मन्मन धांवा-'ये ये परतुनि वेगें !'

दिनभर अविरत जरि गढलों व्यवसायांत
जरि मग्न राहतें त्यांत सारखें चित्त
परि उठतें काहुर सन्निध येतां रात
जिव होय पिसा गे छळी दुष्ट एकांत

# तरंग

जरि दूर सारिले मोहपाश सखि पुरते
हळहळे तयांस्तव जीव, ऊर तळमळतें
निःशब्द रात ही, शांत पुरें भवताल
अंतरीं राजसे घुमे तुझा मधु बोल

सन्मुख सखये जरि नसे रम्य तत्र काया
झांकतां लोचनें तुझीच हसते छाया
—कां छाळिसी ऐसी वृथा सखे गरिबासी ?
— कां विरहाचा मजवरी सूड उगवीसी ?

# हा गौरव तुझिया दिव्यत्वाचा

गे मिटतां डोळे रम्य तुझी ती
—खेळे पुढतीं मूर्ति
जी रमती मजसह सुखें सोडूनी
—लज्जा-शंका-भीति
जरि पाहुन मम ही असली गत, मज
—गणाशिल लंपट भारी
मनिं हसशिल म्हणशिल-पुरती झाली
—'पागल' आतां स्वारी।

परि सैन्निध जातां दिव्यत्वाच्या
—स्वयें दिव्यता ल्यावी
ही स्फूर्तिशालिनी वृत्ती कविची
—का न सखे तुज ठावी?
तव सन्निध येतां मी ही झालों
—वेडा तूजसमान
हा गौरव तुझिया दिव्यत्वाचा
—माझा जरि अवमान!

# रुजली हृदयांत

रुजली हृदयांत — माझिया — सुंदर फुलवेली
अश्रूंचें पाणी — पाजुनी — तूंच वाढवीली
नाजुक किति कलिका — शोभल्या — काल तिच्यावरतीं
आशाकांक्षांना — मनींच्या — माझ्या फुलवीती

मंद मंद वात — वाहतां — करितो कुजबूज
उमला उमला गऽ — कळ्यांनो — उमला ना आज
भरुं द्या गऽ मजला — सुवासें — भरुं द्या गऽ रानें
झुलुं द्या झुलवूं द्या — कुणाला — त्याच्या नादानें

अधीर जग बघण्या — कळ्यांची — ती फुलती लीला
धन्य धन्य झालें — किती त्या — नाजुक वेलीला
आघटित परि आज — मनीं तव — भुजंग अविचार
अवचित गे उठला — विषारी — सोडी फूत्कार

नाजुक फुलवेली — दग्ध ती — तया क्षणीं झाली
टप टप टप गळली — कळ्यांची — बरसातच खालीं
नाहीं त्या फुलल्या — नाहिं त्या — फुलणें यापुढतीं
स्वप्नांतच बघणें — अलींची — केली त्यांवरतीं !

## खबरदार

ठाणबंद ठेवा करुनी ही मस्तवाल अवलाद !
करुं नका दया मुळीं याची घोडें हें फार उनाड
रागानें जरि फुरफुरुनी
उकरील खुरांनीं धरणी
अतिकर्कश खिंकाळ्यांनीं
करि तरी करूं द्या जिद्द-- ही मस्तवाल अवलाद !

जरि आणिल पाणी डोळा पाहील करुण नेत्रांनीं
लाचार करुनिया मुद्रा विनवील मूक वचनांनीं
सोडीलहि भूक-तहान
नच घेइल दिनभर अन्न
राहील बैसुनी खिन्न
परि दावुं नका हमदर्द— ही मस्तवाल अवलाद !

हें करील सारीं सोंगें आणील फेंपरें भारी
येईल फेस तोंडाला पडतील नेत्र बाहेरी

## खबरदार

आंवरा परि अपणाला
नच येऊं द्या करुणेला
व्हा कठोर ह्या वक्ताला
खरि खरी करा हो हद्द-- ही मस्तवाल अवलाद !

जरि कराल याची करुणा होईल हसें हो लोकीं
जोंवरी बांधला याला तोंवरी च याची नेकी
जोंवरी बांधला जेर
जोंवरी वरी खोगीर
तोंवरी दिसे साचार
उधळे परि सुटतां बंद— ही मस्तवाल अवलाद !

# विधु उभयांवरतीं अमृतधोत उधळील !

विलगुनी पदा तव महासागरा धरणी
वाहते ओघ हे प्रीतीचे तव चरणीं
जाहली मूढ तव बघुनी धीरा मूर्ति
विसरली आपणा - धन्य धन्य ही प्रीति !

प्रीतिचें मोल या नाहिं कसें तुज ठावें
रे हिच्या पदीं निजजीवित तूं अर्पावें
तिजसाठीं सारें मीपण तूझें व्हावें
सर्वस्व वाहिलें जिनें तुला सद्भावें !

त्रिभुवनीं सागरा उदार तूं विख्यात
परि कैसी पदवी फोल तुझी ती होत !
झांकुनी पोटिंची रत्नें पोटीं, बससी
तो पोकळ सारा फेन वरी उधळीसी !

हासरी चांद्रिका पळभर गगनीं हसतां
पळभरी धवलिमा अंबरभर पसरीतां
सोडूं धरणीला बघसी- उसळ्या घेसी
या उधाण ऊर्मी वरी वरी चढवीसी !

तव साधी भोळी धरा तिला नच कळतें
रे चाटा चाळे काय तुझ्या हृदयीं तें

## विधु उभयांवरतीं अमृतधोत उधळील !

हर्षोर्मी बघुनी तुझ्या हासते तीही
पुलकित हो तीही चंचल विधुकिरणांहीं !

उगवला चंद्रमा केवळ नच तुजसाठीं
तो देई स्फूर्ती अखिला विश्वा मोठी
फुलवितो कुमुदिनी पाझरवी शशिकांता
खुलवितो हास्याा नवथर रमणीकांता

तो मोदभरें फेंकितो सुधामय दृष्टि
हो उच्छृंखल रे क्षणांत सारी सृष्टि
परि ठेव मनीं हें स्थान तयाचें गगनीं
रे दुरूनिच चाले त्याची किमया भुवनीं !

जरि आकुल झाला शशिहि तुला भेटाया
घेतसे ओढ तुज गाढालिंगन द्याया
सांगती जाणते – 'युती तुजसवें त्याची
होतांच मृती रे तव, त्याची, पृथिवीची' !

दिधली तुज विधिनें साधी भोळी अवनी
तिजसाठीं सारें तनमन अपुलें मानीं
हें तुझें धरेचें कुतुकें कुतुक बघेल
विधु उभयांवरतीं अमृतधोत उधळील !

# प्रेमवल्लरी

मूळ कुठें तव प्रेमवल्लरी, कोठें तव विस्तार!
कोठें तव तें रूप मनोहर, कोठें तव फलभार!

अजाण बाला जिला न अवगत जगताचा या न्याय
परी जियेच्या लिखित ललाटीं शोक कष्ट अनिवार्य

लालन नाहीं ज्या जीवाचें केलें कुतुकें कोणी
प्रेमभरें नच कुणीं चुंबिलें ज्या अंकीं घेऊनी

माय सोडुनी जाय जियेला पृथिवीच्या ओटींत
पिता पारखा जिला जाहला संसृतिच्या हाटांत

तिच्या हृदीं तूं घेसी जन्मा धन्य धन्य तूं माई
प्रीतिलतिके विश्वमोहिनी सुखदु:खांचे आई

वास तुझ्या मधु सुमनांचा त्या जगतीं गे पसरूं दे
वास तुझा परि दु:खार्णविं हें जगताला विसरूं दे

# ही प्रभूची माया

घे पाउल मागें रात घोर अंधारी
बघ नवीन पसरे सखये दीप्ती हसरी
अंधार विदारुनि येई उषा आकाशीं
नवजीवन देई मोहमग्न अवनीसी
हें रूप गोजिरें सांग पाहुनी कोण
ती रात भयंकर नच जाई विसरून!

जरि आज ठाकलें दिव्य तुजपुढें कठिण
त्यामागें छपुनी तुज बाही बघ कोण
वेदना असह जरि सारुनि दूर तियेतें
तुज बघुनी चिमणें तोंड कुणाचें हसतें
संकटें झांकुनी इवल्या नाजुक हातें
आयु:पथ करि हा सुकर लाडक्या हसितें
बघ उधळित आशा हसरी येई उदया
ही प्रभुची माया, माये, तुज भेटाया!

# आई

हसत हसत रमली गेहीं कठिण संकटें हीं
हसत लंघुनिया जाई वागुरा घना ही
मनीं तुझ्या जळते चिंता—झाकुनी तियेला
मुखावरी विलसे शांती—काय म्हणूं याला!

घर्मबिंदु निशिदिन गळले आयु कंठितांना
कवळ भिजवि निजरुधिरांत–चरिलें पिलांना
शांति धन्य तव हृदयींची, अंत तिला नाहीं
तनू ग्रासिली मृत्यूनें परी हास्य राही

सदय हृदय तूझें आई प्रेमळे विशाल
भिन्न भिन्न हृदयांमाजीं निर्मि सख्यजाल
हालविली ममतावेली शिष्यगणीं नाना
पुष्पवृष्टि करुनी करिसी धन्य धन्य त्यांना

निघसि सोडुनी जाया तूं नश्वरा जगा या
भिन्न भिन्न हृदयें जमलीं तुला गौरवाया
मार्ग शिंपिला तव देवी अश्रुजलें त्यांहीं
हसत हसत जाई आतां दिव्यपदा आई

# आज हवी होतीस

"हे उंच वाढतिल चिमणे अंकुर
देतिल शीतल छाया
मी विसावेन त्या छायेमधिं जायिं
होइल जर्जर काया"
ही असेल अस्फुट आशा हृदयीं
ह्यांच्यास्तव झटतांना
रक्ताचें करूनी पाणी त्यांना
जीवनभर देतांना

वाढले उंच ते तरुवर तूझे
भिडले गगना आज
बिलगुनी तयांवर लता चढविती
मंगल सुंदर साज
हें बघण्या कौतुक बाळाचें निज
फुलली बघुनी आस
गाळण्या सुखाचे आसू, आई,
आज हवी होतीस!

# अभिनंदन

हा मार्ग व्यापिला आजवरी रे पुरता
संकटदुःखांहीं, मित्रा, जरि तव होता
परि पहा उगवली नवीन आतां तारा
उजळील तुझा पथ दूर करिल अंधारा

रे निशा संपली चिंतांची क्लेशांची
तव हांसत आली उषा दिव्य सौख्याची
उद्यान उघडिलें आज तुजपुढें दैवें
नव नव पुष्पांचीं आंत चमकती विभवें

कां स्तब्ध जाहला, दिपला तेजानें वा
घे तुझ्याचसाठीं नवा उघडिला ठेवा
ही कृपा प्रभूची मूर्त बनून तव भार्या
ये सदनीं देण्या यश तव ईप्सित कार्या

जरि सिद्ध सदा तूं हिच्या रंजनासाठीं
ही होइल सुखदा वैजयंति तव कंठीं

# निर्मलराणी

रुसेल पळभर पुन्हां हसे — हसतां हसतां क्षणीं रुसे
हासूं आसू उभयांचें — संमेलन बहु थाटाचें
जमलें जीच्या हें नयनीं — ती अमुची निर्मलराणी
धांवत पुढतीं येईल — प्रेमें तुजला बिलगेल
हर्षें कितितरि नाचेल — हसेल तुजला हसवील
म्हणशिल तो प्रेमा बघुनी– — 'खरीच ही राणी राणी !'

क्षणभर बोलुं नको तिजशीं — क्षणभर कर गम्मत ऐशी
जवळ मुलीं तिज घेऊं नको — प्रेमें तिज कुरवाळुं नको
वळेल मागें रागांत — त्वेषानें चावुनि ओठ
बसेल जाउन कुठेंतरी — कोंपऱ्यांत रुसुनी स्वारी
फुगे फुगवुनी गालांचे — गाळिल आसू मोत्यांचे
म्हणशिल तो नखरा बघुनी– — 'खरीच ही राणी राणी !'

हळूच मग डोळे पुसुनी — तुजजवळीं येइल उठुनी
हास्यमुखें तुज बाहील — दुरूनिच तुजला खुणवील
तूंहि सख्या पसरुनि हातां — जवळ तिला घेईं आतां
दुडुदुडु धांवत येईल — मिठी गळां दृढ घालील
पुन्हां उम्हाळे येतील — रडेल, तुजला रडवील
म्हणशिल चुंबुनि तिला झणी– — 'खरीच ही राणी राणी !'

# रोहिणी

“ काय समजसी सांग आपणा, बाळे, राणी इंद्राची
सांग तारका कीं गगनींची, ख्यात अप्सरा स्वर्गींची
उभी आरशापुढें सदाची रूप आपुलें न्याहळित
दिनभर नखरा हाच सारखा सांग कोठली ही रीत!

कौतुक अपुलें करितां आपण, भान जगाचें नच कांहीं
उभा कधींचा येऊन मागें दिसलें तुज अजुनी नाहीं ! ”
“ पुरें पुरें रे कळलें मजला– ” गाल फुगवुनी ती वदली
“ मुळीं न रुचते सदाकदाची मजला ही थट्टा असली!”
ऐकुनि वच तें पुन्हां हासलों पुन्हां चिडविलें मीं तिजला–
“ मोठी सौंदर्याची देवी ठाऊक अससी गे मजला !
राग कसा तर उभा टपूनी इवल्याशा नाकावरतीं
खराच मानिल कोणी नवखा मला नको त्याची भीति!”

किती चालली असती गम्मत किती चिडविलें तिज असतें
मधेंच आली परी भरूनी भरती गंगायमुनांतें
पाणिपल्लवीं तिनें लपविलें वदनकमल लववुन खालीं
मला भासलीं ममही नेत्रें तया क्षणीं झालीं ओलीं

# रोहिणी

जवळ घेउनी वदलों तिजला—"उगी उगी माझे बाई
उगा दवडिसी किती, रोहिणी, बहुमोलाचीं मोत्यें हीं!
रूपसंपदा अशी लाभण्या थोर लागते पुण्यतती
ना तर मूर्ती हनुमंतांची माझ्यासम दैवीं येती !

मला लाभतें तुझ्यासारखें रूप मनोहर जरि असलें
रात्रंदिन गे मींही ऐसे नसते का केले चाळे!"
"खरेंच!" वदली डोळे पुशिले वदन वरी उचली बाला
खुदूकन् हसली, पुन्हां लाजली, पुन्हां लपविलें मुखकमला

# कां वृथा—

कां वृथा ओढिसी जिथें मला नच हांव
का आग्रह भलता नको नको मज नांव
मज नको प्रसिद्धी नको वानण्या लोक
मज पुरे सख्या रे पुरे स्नेह तव एक

कारण्या जागिं मजसी ख्यातनाम तूं झटसी
अणुसम गुणकण मम मानुन घेसी राशी
मम शब्द आरिखे, विचार माझे हीन
सद्भाव तुझा दे काव्य तया अभिधान

औदार्य तुझें हें - साच तुझा रे प्रेमा
परि मला ठाउका पुरता माझा लाघिमा
तो नाहीं दिसला तुला, न दिसणें पुढतीं
तव दृष्टि अंध रे स्नेहमयी मजवरतीं

परि ऐक विनंती एकच तुजला आण
हें पटल सारूनी खरें रूप मम जाण
मज नको लाजवूं नको देउं तें स्थान
ज्यावरी अधिष्ठित धन्य कवीश महान

# अभीष्टचिंतन

दिसेना कुणाला पुढें मार्ग, झाले
कुणी चालतां श्रांत ध्वांतातुनी
कुणी जाहले आंधळे आपुलीं लोचनें
आपुल्या हस्तकीं झांकुनी

तयां शांतवाया, तयां धीर द्याया
तयां दाविण्याला खरी उन्नति
उभा हातिं घेवोनि ज्ञानप्रदीपा
जगा दावितो वाट ध्येयाप्रति

चला पूजुं त्या पूजका शारदेच्या
तिला प्रार्थुं देण्या तयाला जया
पहा पातली मंगला पुण्यवेला
चला सत्वरी पूजना सिद्ध व्हा

जिथें रान मोकाटसें वाढलें जेथ
पर्णातृणांवीण कांहींच ना
तिथें बांधलें आज मंदीर देवी,
तुझी नित्य चाले जिथें अर्चना

असें चालवीलें जयें सत्र मोदें
जरी संकटें घोर हीं पातलीं
महापूरुषा त्या नमूं आदरें वाहुनी
आज प्रेमाश्रु – पुष्पांजलि !

# उपकारस्तुति

शाखा तुझी, हे प्रभो द्राक्षवेला, तुझ्या जीवनाशीं अशी एकता
झाली जयाची असा भक्त तूझा तुझी भूति लोका सदा दाविता
जेथें न ठावा कुणा ख्रिस्त तेथेंच मंदीर तूझें जयें बांधलें
अज्ञान-पंकीं निमग्नां जनांना तुझें ज्ञान देवा जयें अर्पिलें

"तूं दाविला दीप, तूं आंखिली वाट, ती मात्र सानंद चोखाळिली
काया दिली तूंच तूलाच घे ही, तुझ्या कारणीं सर्वथा वाहिली
वाचा-मनें अर्पितों घेइं देवा, तुझीं तूंच" ऐसें जयें प्रार्थिलें
भक्ती तुझी तेविं सेवा जगाची, अहा आयु ज्याचें असें रंगलें !

त्याचा करूं आज सत्कार मोदें, तुला प्रार्थुं ईशा जगच्चालका
दीर्घायु दे या जगत्किंकरा, सात्त्विका ख्रिस्तशिष्या, तुझ्या बालका
सेवा तुझी हीच विश्रांति ज्याची, प्रभो लाभुं दे त्याजला नित्य ती
बापा तुला प्रार्थितों नम्रभावें यशोदा सदा शक्ति दे त्याप्रति

आणोत वाहून स्वर्गांतुनी तेजराशे प्रभो भूवरी संप्रति
येशू, तवांशू शुभाशी, शिवाशा विशाला तुझ्या श्रेष्ठ शिष्याप्रति

# न धाडलले आभार

मम आज कलेची कळी खुले तव स्नेहल गे स्पर्शानें
वैभवें नटवुनी तिजला नवभा दिधली तूं कुतुकानें

स्कंधिं जरि मीं वाढवीली
मींच अंकीं खेळवीली
सौंदर्य तिचें परि आज जाहलें प्रकट तुझ्या वचनानें

घालवीले अब्द वाया
ज्या कलेतें तोषवाया
ती प्रसन्न हसली जणूं बोलली मजसंगें तव वदनें

पूर्ण झाली साधना ही
येइ हातां आज सिद्धि
रसिकता चिमखडी मूर्त भेटली बाले तव रूपानें

आज कालिका पूर्ण फुलली
अवतिंभवतीं गंध उधळी
तूं सार्थक केलें तिच्या यशाचें गे एक्या शब्दानें

# आज आणि उद्यां

अर्धस्फुट लाजरी हासते आज कळी मुग्ध
किंचित् फुलवी, पुनरपि लपवी, हसरा आमोद
पूर्ण फुलोनी उद्यां सुमन हें जगता डुलवील
चंचल सुरभित मारुतलहरी भवतिं नाचवील

जरी आज ही मिटली शुक्ती दडली अब्धितळीं
कुणा न ठावी किती दिव्यता तीमाजीं छपली
आणुन करतीं भाग्यवंत कुणि उघडुन ती बघतां
उज्वळित दाही दिशा झळकती प्रकट होय मुक्ता

मनोमुकुल गे कुण्या कवीचें सहजच खुलवीते
मूर्त रसिकता आज भासते तुझ्या मिषें हसते
होशिल परि तूं गडे दाविण्या आगळीच आभा
महाकवीची कुणा उद्यांच्या स्फूर्तिमती प्रतिभा

भाविकालचें विभव मनोहर अनर्घ्य तत्र असलें
नवल देख हें मला खुळ्याला आजच गे दिसलें

# अपराध्याचें आवाहन

तव उदार हृदया आवाहन हें
माझें अपराध्याचें

जा विसरुनि बाई काल बोलिलों
परिहासें जें वाचे

दाविला अहेतुक आजवरी जो
प्रेमा मजवर बाले

कां फेड तयाची या 'नीचानें'
अशी करावी नकळें !

गे कैसें दावूं तुला तोंड हें
कैसें तुजसी बोलूं

दाटतें आंतल्या आंतच मानस
कसें तुजपुढें खोलूं !

जी असेल माझ्यास्तव तव हृदयीं
उरली भक्ति प्रीती

गे शपथ घालितों तुला तियेची
घेइं गुन्हा हा पोटीं !

# निरोप

सारखी यशाची मम चढतीच कमान
सारखी पसरती कीर्ति, वाढता मान
विद्वद्वर म्हणुनी वानिति मज गण सारे
ही तुझीच माया पसरी सर्व पसारे

अव्याजमनोहर हास्य तुझें खुलतां गे
मावे न मनीं मम मोद उसळतो वेगें
त्या हास्यास्तव तव रान जिवाचें करुन
झटलों--तयासवें लाधे यशहि महान

त्या स्नेहभरें भरल्या तव दृष्टिक्षेपें
अवसान चढे मज माझें नच आटोपे
ती स्फूर्तिमयी प्रतिभा गे देतां हात
हो अंकित सारा कीर्तियशांचा थाट

जी जन्मभरी झटुनी कणकण जमवीली
कारणीं तुझ्या तीं पुण्याई ओतीली
तव एक्या शब्दें सार्थक त्यांचें झालें
जे आजवरी मीं कष्ट सारखे केले

# निरोप

व्यानींही नाहीं आलें कधिं आलीस
स्पर्शुन मम हृदया स्फूर्ति कधीं दिधलीस
गे नाहीं कळला प्रेमा तयिं तव पुरता
जिव आज तळमळे सोडुन तुज परि निघतां

चालिलों सोडुनी आज तुझी ती प्रीत
ओतिलें जिनें संजविन मम जीवांत
एक ही प्रचीति धीर मना मम देई
पद अढळ लाधलें कोपऱ्यांत तव हृदयीं

संपला योग हा तूझा माझा येथें
सांवरीं खुळे या पाझरत्या हृदयातें
राहुं दे मनीं परि - एक खुळा तुज वाही
नयनांच्या पसरुनि पायघड्या तव पायीं

जा सुखें तयाची राणी तूं होशील
गे करीं जयाच्या विधि तुजला निरवील
येई त्यासह कर धरून तयाचा बाले
या स्मरण खुळ्याचें सहज कधीं जरि आलें

# 'कविरायाची जाथर'

काय हातीं आलें माई डोळे भरूनीया पाहीं
खुलताहे पदोंपदीं कला तुझ्या भाग्याची ही
धन्य झाली आज वाला येई तियेच्या वांट्याला
कांठोंकांठ भरलेला दिव्य अमृताचा भेला
शारदेनें घडविला तुझ्या हातीं सोपविला
कल्पलतेचा हा कंद लाव सारा जीव त्याला
बघूं नको धनाकडे बघूं नको मनाकडे
सेवा याची करितांना बघूं नको तनाकडे
जिवाचें गे रान करीं करीं रक्ताचें गे पाणी
वाढवीं गे प्रेमभावें यासी सर्वस्व वाहुनी
वाढू दे त्या फोंफावूं दे छाया त्याची पसरूं दे
शिणलेल्या वाटसरां पायीं याच्या विसावूं दे
विसावून म्हणतील "धन्य देवाची करणी
कल्पवृक्ष आम्हांसाठीं ठेवी मार्गी उभारूनी"

परी एखादाच द्रष्टा ओळखील तुझी सत्ता
तुझी माया पाहुनीया नमवील झणी माथा
नादावून म्हणेल तो "धन्य देवी! धन्य धन्य!
सांभाळीसी कल्पवृक्षा जिवें भावें रात्रंदिन!"

# उषाराणी

पांखरांच्या मुखीं
गोड गात गाणीं
कुणीतरी येई
माझिया अंगणीं

कोण गे गोंजारी
जवळी येऊनी
वायुलहरींच्या
शीतल करांनीं

कुणीसें हांसलें
माझिया ग दारीं
नाजूक हास्याची
कानीं ये लकेरी

हळू साद घाली
कोण ग कानांत
"ऊठ ऊठ बाळ
-सरली रे रात"

डोकावीत कोण
खिडकीमधूनी
हळूच पसरी
आनंद सदनीं

नाजूक हातांनीं
कोण सारी दूर
लोचनांवरची
स्वप्नांची चादर

अजून नाहीं का
ओळख पटली
तुझ्याशीं खेळाया
उषाराणी आली

# बालकवि

स्थळ

उडे आकाशीं रसिकराज कोणी
कल्पनेच्या निज बसूनी विमानीं
किती फिरला स्वच्छंद अंतराळीं
किती संध्येसह खेळला गुलालीं

क्षणीं मेघांच्या दुलइवरीं लोळे
तारकांशीं सानुल्या क्षणीं खेळे
रमत नकळे किति वेळ असा गेला
बाळ अंतीं खेळतां श्रांत झाला

मार्ग गवसेना परी घरा याया
पिसाटासम लागला तैं पळाया
शैलशिखरीं अत्युच्च गगनभेदी
आदळे आणि निश्चेष्ट पडे शादीं

थोर त्याचें परि भाग्य थोर लाहो
शारदेच्या अंगणीं पातला हो
हळुच बाळाला उचालिलें कुणींसें
अंकिं देवीच्या हळुच ठेविलेंसें

# बालकवि

स्वयें वाग्देवी कवाळि त्या उराशीं
चुंबि त्याला वत्सासि माय जैशी
ऊर्मि प्रेमाची हृदीं तिच्या आली
स्फूर्ति त्याची तत्क्षणीं मूर्त झाली

क्षणीं कलिकेला पुष्पपणा आला
बालरसिकाचा बालकवी झाला
घुमवुं लागे अंबरीं स्वैर ताना
डुले जगती सानंद ऐकतांना

# लहरींचें गीत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
क्र. ७८३५

हासूं या नाचूं या
गुंगुनि जगता रंगवुं या

नवीन कळी वनिं खुलली
सौरभ पसरी भवतालीं
लुटुनीया गंधा [illegible]
दाहि दिशांना उधळूं या

हासूं या नाचूं या
गुंगुनि जगता रंगवुं या

तटिनि कशी शांत अशी
चला तिलाहीं बनवुं पिशी
उरीं तिच्या वागडुं या
गोफ जलावर गुंफूं या

हासूं या नाचूं या
गुंगुनि जगता रंगवुं या

येइ उषा, दाहि दिशा–
नटती – नटविति आकाशा
जमवुनिया खगां, तयां
गीतें मंजुळ शिकवूं या

## लहरींचें गीत

हासूं या नाचूं या
गुंगुनि जगता रंगवुं या
हळु हंसती मधुर किती
लता तरूंसह कुजबुजती
हळूच या छपुनीया
पाठ प्रीतिचे ऐकाया
हासूं या नाचूं या
गुंगुनि जगता रंगवुं या
गोड रुसें गोड हसें
तरुणांना तें जडवुं पिसें
लहरी या, त्या हृदया
उच्छृंखल झणि बनवूं या
हासूं या नाचूं या
गुंगुनि जगता रंगवुं या
शोक हरूं मोद वरूं
आनंदें दिक्काल भरूं
हासत या नाचत या
स्वर्ग महीवर वितराया
हासूं या नाचूं या
गुंगुनि जगता रंगवुं या

# वेडा

हासतें बोलतें केव्हां कांहिं कसेंही
उपचार न जाणें रीतभात नच कांहीं
धांवतें कशाच्या मागें पागल पुरतें
धडपडे परी नच पाही अवतें भवतें
कुणि हसो कितीही याला — लाज ना
कुणि निंदो वंदो त्यासी — पुसत ना
हें चाले अपुल्या नादें — सतत ना
सोडिली जनाची लाज मनाची सारी
ओसाड मोकळ्या यास दिशा या चारी

कुणि खुशाल जमुनी मांडिति याची थट्टा
मारिती खडे त्या, करिती सर्व कुचेष्टा
पाहिना खुळें परि वळुनि त्याकडे मागें
थांबे न पळभरीं पुढतीं धांवे वेगें
त्या अंगावरतीं चिंध्या — लोंवती
तीं भुंकत मागें श्वानें — धांवती
परि मुळिं नाहीं एकाची — त्या क्षिती
धांवतें सारखें पिसाट पुरतें झालें
त्या भान जगाचें तिळभर नाहीं उरलें

# वेडा

हासती जाणते अजाणतेही सारे
कुणि म्हणती "पिटुनी ह्यास हांकुनी द्या रे"
परि बघुनी त्यातें एक बालिका हसरी
हांकारी त्यातें – "येइं खुळ्या माघारीं
　　कां सांग धांवसी ऐसा — सारखा
　　हरपलें श्रेय शोधाया — भ्रमसि का
　　भिडनिया सांग कोणासी — पळसि का
रे सांग, नको रे चोरूं जिव्हा ऐशी
तुज काय जांचतें सांग सांग रे मजसी"

थबकलें क्षणीं तें वळलें मागें ध्यान
खदखदां हासलें पाही तिज निरखून
भिडतां ती दृष्टी खिळली जागीं बाला
त्या खुळया लोचनीं आढळ कसला झाला!
　　ही दृष्टि नसे वेड्याची — बाइ ग
　　मज भासे ती ज्ञात्याची — बाइ ग
　　जे ब्रह्म जाणतीं त्यांची — बाइ ग
तें बघण्या देवें अशीं लोचनें द्यावीं
जें दिसतां पृथ्वी स्वर्गतुल्य भासावी

धीरा वाणी मग कार्णि तिच्या तो घुमवी
"बघ पुढें तळपतो दिव्य मनू गे भावी
जें जगता नाहीं दिसलें, नच दिसणार
त्या दिव्यत्वातें धांवुन मी भिडणार
चल ये ये माझ्यासंगें — बालिके
सौंदर्य पाहुं गे भावी — तें निकें
चल लुटूं तेज गे त्याचें — कौतुकें
गांठण्या त्यास गे अधीर झालें हृदय
गे ठरे न आतां पळभर येथें पाय!"

क्षणभरी भासलें तिजलाही तें दिसलें
क्षितिजावर हसरें स्वर्णतेज खुललेलें
क्षणभरी जाहली तीहि खुळी त्यासंगें
कर धरुन तयाचा तीही धांवूं लागे
आरडा सुरु करिताती — ते बघे
"कोणासह उठुनी जासी — थांब गे
का पिसी कोळुनी सारी — भीड गे!"
थांबली बालिका मुख लपवी दो हातीं
एकलें 'खुळें' परि धांवे पुढतीं पुढतीं

# कधीं येशील ?

कधीं येशील ?
—येशिल मम गेहा
वाहिन जीवन तव पाया !

कधीं येशील ?
—व्याधि आधिसंगें
भक्तिपथ दावाया वेगें

कधीं येशील ?
—येइं जरादेवी
मन्मती प्रभुचरणीं वळवीं

कधीं येशील ?
—ये मृत्यो मित्रा
तुझ्याविण कोण मुक्तिदाता !

# देवाच्या राज्याचे वतनदार

प्रातःकाळीं उठतां प्रतिदिन दीन फोडुनी टाहो
प्रार्थी देवा शरण दास हा मजला सांभाळा हो
उपासना, प्रार्थना, गायनें, शास्त्रवाचनें नित्य
ढीग लागला घरांत माझ्या भरलें ओतप्रोत !

नित्य मंदिरीं करितों भक्ती प्रभुभोजन मी घेई
निते उपदेशा करितों 'अन्या माझ्यासम रे होई'
नगर वसविलें डोंगरावरीं तूं तें घर माझेंच
झालों जगता आदर्शच मी समान माझ्या मीच

घोष चालिला प्रभो अहर्निश तुझिया शुभनामाचा
तन तल्लीनच, मन तल्लीनच, तल्लीनच ही वाचा !
राशी जमल्या डोईवरतीं प्रचंड पुण्याईच्या
देवा देवा धांव चालिलों चिरडून भारें यांच्या !

नाहीं नाहीं कोणी मजसम जगांत भक्तश्रेष्ठ
भक्तिमार्गीचा स्तंभदीप मी दावी जगता वाट
प्रभो ठाउकी तुलाच महती मम कैशी अजमाऊं
पुत्र तुझा मी ! ख्रिस्ताचाही मीच थोरला भाऊ !

पुरें जाणिलें मींच ईश्वरा धन्य तुझ्या नीतीतें
तुझें घेउनी नाम करावें खुशाल मनीं ये तें तें

शंख करुनि मग मात्र म्हणावें ‘ ऐका ऐका जनहो
हीच प्रभूची इच्छा देखा अपूर्व झाला लाहो ! ’

तुझा भक्त मी, तुझा पुत्र मी देव मीच ना येथें
भक्तांकरवीं कां मीं, माझ्या करूं नये पूजेतें !
म्हणोत कोणी ढोंगी मजला नास्तिक ते चांडाळ
छायेखालीं तुझ्या उभा मी कां मज त्यांची चाड !

दाही आज्ञा दिल्या टांगुनी दाराच्या बाहेर
चुकून त्यांचा प्रवेश नाहीं घरामधें होणार
खटपट माझी सदा तोडण्या जें जें तूं जोडीलें
परी पाप तें माझ्या माथीं नाहिं कधीं बसलेलें

तुझ्या खेळवी पवित्र शास्त्रा जिभेवरी मी माझ्या
अर्थ बदलुनी नित्य तयाचा पार पाडितों काजा
आणि येतां कधीं गळ्याशीं – कधीं उलटतां सौदा
दांत विचकुनी सिद्ध सदा हा क्षमा मागण्या बंदा !

---

न माझें असें यांत कांहीं स्वताचें
नका रागवूं या गरीबावरी ।
दिसें आपुलें चित्र हें आपणां मात्र
मीं मांडिला आरसा सामुरीं ॥

# जो तो निजा अनुसरे कुळशीळधर्मा

कां पाजिलेंस भुजगांप्रति दुग्ध फार
कां पोशिली विषलता श्रमुनी अपार
देऊनि रक्त ह्रदिंचें वृक माजवीला
मूढा कशास असला पथ आदरीला

ते धांवतील चरण्या तुज सर्प दंश
घेईल जीव लतिका तव नीच खास
तो फाडण्या शत्रु तुझें वृक घेइ धावा
ह्या हन्त हन्त पुरता फसलास जीवा

देऊं नकोस भुजगां परि दोष कांहीं
छेदूं नको विषवल्ली लतिका तरीही
शापीं वृका न वधसी जरि नीच कर्मा
जो तो निजा अनुसरे कुळशीळधर्मा

द्यावा जरी धजसि दोष कुणास कांहीं
द्ये तो तुलाच! कळणें तुज नीति नाहीं

# पोपटमैना

## ( दुगाणी )

| | |
|---|---|
| तो: चल चल सजणी गाउ झणी | .... .... .... .... |
| ती: .... .... .... .... | पोपट – मैनेची गाणी |
| चलचल सखया गाउ झणी | .... .... .... .... |
| तो-ती .... .... .... .... | पोपट–मैनेची गाणी |
| तो: सखये - साजणि - वेल्हाळे | .... .... .... .... |
| ती: .... .... .... .... | जिव तुजवाचुन कोल्हाळे |
| तो: साहु कसे वद हे क्लेश | .... .... .... .... |
| ती: .... .... .... .... | पुरे पुरे हा आक्रोश |
| ओळखिले मुळि मज नाहीं | तुझीच मी संतत राही |
| तो: चल चल रमणी नाचु उडू | .... .... .... .... |
| ती: .... .... .... .... | नका साजणा ! हसू ! रडू ! |
| तो: वनामधी जाऊ राणी | .... .... .... .... |
| ती: .... .... .... .... | सत्वरि झडकरि येइ झणी |
| प्रेमरसे न्हाऊ राया | .... .... .... .... |
| तो: .... .... .... .... | सत्वरि झडकरि लौकरि या |

मी राघु तू सखि मैना .... .... .... ....
तीः .... .... .... .... घे तानांवरती ताना !
सख्या— .. .... .... .... .... .... ....
तोः ....—सखे ! .... .... .... .... .... ....
तीः .... ..—सजणा ! .... .... .... .... ....
तोः .... .... —सजणी ! .... .... .... ....
तीः .... .... .... .... प्रिया ! .... .... ....
तोः .... .... .... .... .... —प्रिये ! .... ....
तीः .... .... .... .... .... .... —राया ! ....
तोः .... .... .... .... .... .... ....—राणी !
नाजुक कलिका तू सखये — .... .... .... ....
तीः .... .... .... .... भृङ्ग सख्या तू लौकरि ये
हो मधुपानामधि दङ्ग .... .... .... ....
तोः .... .... .... .... तुझा लाडका मी भृङ्ग !
गाइन तुजला मधु गाणी .... .... .... ....
तीः .... .... .... .... वाहिन तुजला मधु-गाणी

# पोपटमैना

तू राघू मी तुझि मैना .... .... .... ....

तो-ती: .... .... .... .... तानांवर चढवू ताना !

तो: प्रिये— .... .... .... .... .... .... ....

ती: .... —प्रिया ! .... .... .... .... .... ....

तो: .... ....- राणी ! .... .... .... .... ....

ती: .... .... ....—राया! .... .... .... ....

तो: .... .... .... .... सजणी—.... .... ....

ती: .... .... .... .... .... —सजणा ! .. ....

तो: .... .... .... .... .... .... —सखे !....

ती: .... .... .... .. .... .... ..—सख्या !

तो-ती: दोघेही वेडी होऊ ऽऽ वेडे जगताला बनवू

ती: विसरूऽ अव-.. .... .... .... .... ...

तो: .... —घ्या जग—.... .... .... .... ....

तो-ती: .... .... ताऽलाऽ स्मरू एक तुजला मजला!

ती: फिरू गात सदा रानीऽ .... .... .... ....

तो-ती: ... ... ... ... पोपट—मैनेची गाणी !

# नाटक

ऐका ऐका भाविक जन हो कान जिवाचे करुनी ।
एकुलती मम आयुष्याची नाजुक प्रेमकहाणी ॥
हसा ऐकुनी कींव करा वा ठरवा दीड शहाणा ।
खरें तेंच मी परी सांगतों घेतों शंभर आणा ॥

किति रसिकांना हौस परी ना नाटक नाशिकमाजीं ॥
येत कधीं हें का रसिकांनों सांगायास हवें जी ॥
नवनवसांनीं एक एकदा येइ 'चित्रमंदीरीं' ।
पास उपटण्यासाठीं दाटी फुकट्यांची हो भारी ॥

कुणी होइ सासरा नटाचा, कुणी जावयी त्याच्या ।
कुणी मालकांचा मामा हो, कुणी तयांचा भाचा ॥
मांडीवर घे कुणि म्यानेजर बाळ लाडका म्हणुनी ।
ठेवि कुणी पायांवरं डोयी बाप तयास गणूनी ॥

कुणी गांठला बझार-मास्तर, कुणी धरी आचारी ।
भाऊगर्दी करी कुणी अन् कुणी करी लाचारी ॥
'गांवकरी'च्या स्पेशल अंकीं ठळक येइ जाहिरात ।
अभिप्राय अवतरले फक्कड कितिक 'लोकसत्ते'त ॥

# नाटक

भाग्यवंत कुणि गणू गोखला द्वारपाळ ऐटींत ।
चित्रमंदिरीं दारापाशीं खडा विडा चघळीत ॥
त्याशीं दोस्ती करूनी आम्हीं चहा पाजुनी त्याला ।
नाटक बघण्याला रसिकांनों सहज पास मिळवीला ॥

× × × ×

अडकत-धडकत-सरकत वरतीं पडदा नाहीं गेला ।
तोंच रसिकहो, हाय, चहाचा चषक विफल मम झाला ॥
काय जाहलें कुणास ठावें फेल होइ लाईट ।
नवनवसांचें नाटक कसलें सर्व जाइ मातींत ॥

× × × ×

वरंड्यावरी कुणीं ठेविली मेणबत्ति लावून ।
तिच्या भोवतीं बसे कसातरि रसिकवृंद दाटून ॥
हाय्! तयांमाजीं होती 'ती' कुणी उभी रंगेली ।
माशुक मैना – नार छबकडी – सुंदर छेलछबेली ॥

प्रथमदर्शनीं प्रेम म्हणति ज्या तेंच तेंच मज झालें ।
तिच्या कटाक्षासारखें काळिज उफाळून हो आलें ॥
इष्काच्या वाफेवर आलें माझें ऊर फुलूनी ।
सरलों पुढतीं (मनांत धांवा येतोबाचा करुनी) ॥

## नाटक

नकळें कोठुन आलें तेव्हां अफाट मज सामर्थ्य ।
प्रेमामृत दे जीवन पुरुषा म्हणती तें न असत्य ॥
सहज पाडिली मेणबत्ति ती धक्का मीं देऊनी ।
गाढ कवळिली आवेगानें हृदयाशीं ती रमणी ॥

मुख न टेकितों तिच्या मुखावर नवल तोंच झालें ।
जहर प्रीतिचें उभरुनि माझ्या अंगावरतीं आलें ॥
रंग लागला चिकट तेलकट माझ्या तोंडालाहि ।
भपूकन् आला वास विडीचा चक्कर मजला येई ॥

एक ‘शेलकी’ तया मागुनी मर्दानी भाषेंत ।
कानीं पडली ! कांटेरी ही खरी प्रीतिची वाट ॥
उभा राहिला ऐन घडीला कोठुन कुठला भोग ।
नव्हती छबडी नार हाय तो होता ‘मास्तर जोग’ ! ॥

# एदन बाग

आलों आम्ही स्वर्गामधुनी
घेऊन दिव्य शुभाशा
भरून टाकण्या जयघोषानें
अवघ्या भारत देशा
सरली सरली आज अंधिका
चिंता–दु:ख–तमांची
क्षितिजावरतीं आली हांसत
उषा दिव्य सौख्याची
भरुं आनदें दिशा सकलही
गाऊं मंजुळ गाणीं
आज ऐकिली अहा प्रभूची
प्रेमळ मंगल वाणी
पुनश्च दिधला आज तयानें
'एदन बाग' अम्हांला
करा प्रतिज्ञा राखूं त्याच्या
अनर्घ्य दिव्यत्वाला
या या सारें एकादिलानें
व्हा व्हा पुढतीं आज
चला उद्यांच्या इतिहासावर
चढवूं सुंदर साज

# खऱ्या प्रीतीची खरी हीच रीति

दूर गगनीं हासतां चन्द्रकोर
पहा भरतीं सागरा येइ थोर
दूर काया परि मनें एक होती
खऱ्या प्रीतीची खरी हीच रीति

होइ गोचर अंधास दृश्य दिव्य
अरसिकातेंही स्फुरे महाकाव्य
पंगु लंघी गिरि येइ ही प्रचीति
खऱ्या प्रीतीची खरी हीच रीति

तोयबिंदूला नसे जगीं मोल
रिती शुक्तीही तयापरी फोल
हृदीं धरितां त्या तीच करी मोती
खऱ्या प्रीतीची खरी हीच रीति

पुढें ज्याच्या सेवार्थ सदा सज्ज
त्रिलोकींचें समृद्ध भव्य राज्य
देवपुत्रा त्या रूप मर्त्य देती
खऱ्या प्रीतीची खरी हीच रीति

# पुनरुत्थान

पुन्हां हासला अंबरीं चद्रमा तो पुन्हां दूर गेले पहा मेघ ते
पुन्हां दाविती तारका सानुल्या सानुलीं आपुलीं आननें सस्मितें
पुन्हां दूर अंधार तो दुष्ट गेला कुठें काननीं तो मुखा लोपवी
पुन्हां एकदा शुभ्रसें वस्त्र ल्याली रसा हृष्ट झाली मना तोषवी

पुन्हां जाति सारीं सुकोनी क्षणार्धांत गालांवरी गालिचीं आसवें
पुन्हां खेळतें रम्य तें हास्य तेथें पुन्हां देइ चैतन्य आस्या नवें
पुन्हां दाटलें सौख्य पृथ्वीवरी आज शोकाश्रुसिंधू पुन्हां आटला
लवे स्वर्ग खालीं हळू प्रेमभारें पुन्हां चुंबण्या लाडक्या भूमिला

करूं नर्तना गायना विस्मरूं आपणा आज हर्षास नाहीं मिति
प्रभूचे शिपाइ चला गौरवूं त्या, चला आपला शूर सेनापति
जयी आज झाला अहा ख्रिस्त येशू, निमाली पहा भीति सारी खरी
जरा-मृत्यु-मोहादि आराति सारे पराभूत झाले पळाले दुरी

पहा ऊर्मि आल्या सुखाच्या सुखानें तिन्ही लोक त्या लीलया भारिती
पुन्हां ऊठला ख्रिस्त त्याचें यशोगीत गाती, धरा त्यासवें डोलती

# 'मी' ही मम नाहीं उरलें

घे मम आयू हें सारें अर्पित पादिं तुझिया प्रभु रे
घे निमिषें घे दिन अवघे तुझ्या वाहूं दे स्तुतिसंगें

घे कर दोन्ही प्रभुराया प्रीतीनें भर त्या तुझिया
दुर्बल पद जरि हे देवा धांवूं दे त्या, घे सेवा

कंठ घेइं हा गाइन मी केवळ तुजसाठीं स्वामी
अधर गुरो घे त्यांकरवीं वचनसुधा तव जागीं व्हावी

घे धन सारें प्रभु तुजसी नुरो कपर्दिक मजपाशीं
चित्त बुद्धि बल ज्या नांवें घे उचलुनि तुज जें व्हावें

ईप्सित माझें घे आतां तुझीच रे त्यावर सत्ता
केलें बघ हें हृदय रितें होवो तव सिंहासन तें

घे मत्प्रीति--मम जीव तुझे पाय मज सर्वस्व
कण कण ख्रिस्ता तव झालें 'मी' ही मम नाहीं उरलें !

# आनंद आनंद

आनंद आनंद भूवनीं सांठला
हृदयीं दाटला तूझ्या माझ्या

आनंद आनंद व्यापी दाही दिशा
अंतरींच्या आशा सार्थ झाल्या

आनंद आनंद पसेरे आकाशीं
संतचरणांशीं थारा मिळे

"आनंद आनंद" ऐकोनी हांकाटी
विमानांची दाटी वरी होई

"आनंद आनंद" करूं जयघोष
अवनी – आकाश डोलावूं या

"आनंद आनंद" गानीं दंग भक्त
डोले विश्वनाथ ऐकोनीया

# प्रार्थना

शांतता मिळो कधीं न अंतरास माझिया

समरदुंदुभी झडे
बुद्धि-भावनां मधें
युद्ध चाललें सदैव
चालुं देइं अक्षया
शांतता मिळो कधीं न अंतरास माझिया

प्रखर अनल भडकुं दे
मन्मनास जाळुं दे
यातना मला छळोत
येवढी करीं दया
शांतता मिळो कधीं न अंतरास माझिया

दुःखभीति जी हरी
प्रीति सारुं दे दुरी
क्लेश भोगुं दे जिवास
एक आस ही तया
शांतता मिळो कधीं न अंतरास माझिया

## प्रार्थना

सतत भोवतीं इथें
भयद नाचवीं भुतें
छिन्न देह हा करोत
लासि घोर निर्दया
शांतता मिळो कधीं न अंतरास माझिया

हसत कष्ट साहणें
हाच धर्म हें जिणें
शांतता-मूर्ति अभिन्न
भासती जिवास या
शांतता मिळो कधीं न अंतरास माझिया

# समाधान-शांतता

ग्रंथ संग्रहालय

नभ कडकडलें मोडुन पडलें अडवाया मज जरी
तयाला झेलिन वक्षावरी
महाप्रभंजन जगता घुसळत झुंजत ये सामुरी
तयाही लाथाडिन सत्वरी
सरेन पुढतीं पळहि न थबकत तुडवित सागरगिरी
भया नच थारा माझ्या उरीं
दबतील अरण्यें गर्जन मम ऐकुनी
श्वापदें कांपतिल विस्मित होतिल मनीं
नमवील धरा शिर मम पायालागुनी
घोर तपस्या तपुनी झालों जरि विश्वाचा धनी
नुरला जागीं जरि मजसम कुणी
तरी मनाला मिळेल का मम समाधान-शांतता
जिच्यास्तव जीव भुका तत्त्वता

कूट सृष्टिचें सोडविलें जरि बनलों विद्यानिधि
ख्यात जागीं एकमेव तीव्रधी
शिष्यगणांची भवतीं दाटी माझ्या जरि जाहली
कीर्ति मम लोकीं सामावली

# समाधान-शांतता

साक्षात बृहस्पति मज गणतिल मानव
जरि संतत करितिल बुधजन मद्गौरव
दशदिशा घुमवातिल मधु त्याचा प्रतिरव
आत्मज्ञानी तत्त्वज्ञानी सकलकलाश्रय मुनी
नुरला जगीं जरि मजसम कुणी
तरी मनाला मिळेल का मम समाधान-शांतता
जिच्यास्तव जीव भुका तत्त्वता

क्षणैक हसते, क्षणीं क्रुद्ध हो, क्षणिं ढाळी आसवें
सृष्टि ही जीवहि तीच्यासवें
मधेंच हसती, मधेंच रुसती क्षणभर मानीं तापती
क्षणभरी पुनरपि मधु हांसती
ही सृष्टि रडे तयिं रडते का मन्मति ?
ही सृष्टि तापतां तप्त होय का धृति ?
हे जीव हासतां का मति मम नाचती ?
हेंच लाभुं दे सदा, अक्षया, अक्षय वैभव मनीं
नुरला तरि जगीं मजसम कुणी
तधीं मनाला मिळे चिरंतन समाधान-शांतता
जिच्यास्तव जीव भुका तत्त्वता

# संजीवन

---

चिउकाऊंची किलबिल ऐकत खुशाल झोपीं जावें
हें बाळांचें जीवित-वैभव अनर्घ्य जगता ठावें
बाल्य संपतां जीव जयांचा परी तृषाकुल झाला
'संजीवन' तूं देसी बाले तरुणांच्या हृदयाला

वृक्षवराच्या आधाराविण शोभतील का लतिका ?
गुंजनाविना भृंगततींच्या उमलतील का कलिका ?
गाइल कवि का जरी न करितिल कोणी तत्कुतुकाला ?
'संजीवन' तूं देसी रसिका सत्कविच्या प्रतिभेला

प्रचंड तेजोगोल फिरविसी करांगुलि-स्पर्शानें
कणांकणांतुन त्यांच्या भरिसी जीवन तूं प्रेमानें
सेवा माझी स्वल्प परी तव अतर्क्य प्रभुजी लीला
'संजीवन' तूं देसी देवा भक्तांच्या भक्तीला

# सिंहावलोकन

---

चिउकाऊंसंगें गातां गाणीं शिशुपण उडुनी गेलें
राहिल्या पुसटशा आठवणी जरि मन्मन त्यांहीं भरलें

तें येइल आतां – आलें आलें – गेलें यौवन सरुनी
तीं मनींच राहिलीं मनिंचीं स्वप्नें, चित्रें गेलीं पुसुनी

लागलीं गळाया पिकलीं पानें आशांचीं भूवरतीं
तीं गेलीं सुमनें गेला सौरभ उरली आतां माती

नाहीं शांती परि अजुनी हृदया एक राहिली आशा
मायेच्या तोडुन पाशा जिव हा भरुं बघतो अवकाशा

# टीपा

---

### जीवन

'जीवन' या कादवरींत पहिल्या पानावर घालण्यासाठीं एक कविता हवी होती तेव्हां ही अशोकदेवानीं लेखकांस लिहून दिली.

### ही प्रगतिपथावर शिंपिल एकच-

'प्रगति' मासिकाला कवीनें हा संदेश धाडला होता. यांतल्या शेवटल्या दोन ओळी पुढें संपादकीयाच्या शिरोभागीं दिल्या जात.

### इल्लिल्ला

इल्लिल्ला = कांहीं नाहीं. कानडी 'इल्ला'ची द्विरुक्ति.

### हुरहूर

७:१३ माधव = वसंतऋतु. ७:१५ अंधिका = अंधारी रात्र. ८:१३ मी तुझ्या चिंतनामध्यें रंगून जाऊन मर्तूपणा विसरतों.

### आशेची झुळूक

९:१० कुडी = शरीर ९:१८ रेंव = वाळू.

## स्त्री

११:१२ सलील = लीलेनें. सलिलें = पाणी ( अनेकवचन )

११:१४ रोहिणी = नऊ वर्षांची बालिका. ११:१५ सव्याज = मिस्किल.

## गे नवल पाहिलें

१२:७ सद्भावाच्या अष्टकन्यका = आठ सात्त्विक भाव. १२:१२ आण = शपथ. १२:१३ स्वन = सूर. १२:१४ परा, पश्यंती, मध्यमा, व वैखरी या चार वाणी असून वैखरी ही त्यांतील सर्वांत शेवटची, प्रकट होणारी वाणी होय. बाकीच्या तीन शब्दांनीं प्रकट होत नाहींत.

## तारुण्य आणि बाल्य

१३:१२ जगती = पृथ्वी. १३:१३ कुगति = दुर्दशा.

## माया

१५:२ जवें = वेगानें. १५:३ तोंडावर कवडसा टाकून कांहीं पक्ष्यांना धरतां येतें. १५:६ राजहंस मोत्याचा चारा खातात असा कविसंकेत आहे. कवळ = घास.

## किति खुळी सखे तूं

१६:२ परिहास = थट्टा. १६:४ खग = पक्षी, राजहंस. १६:१४ किमया = सोनें तयार करण्याची विद्या; जादू.

## प्रीति

१७:२ अनंगसौरभ. अनंग = मदन, सौरभ = सुवास. १७:६ बाहुलें = निष्क्रिय दुर्बल मनुष्य. १७:९ विभ्रम = अनुरागाचे हावभाव. १८:९. वैजयंति = विष्णूच्या गळ्यांतील माला. १८:११–१२ त्याला मृत्यूचेंहि भय नाहीं. तो परमेश्वराचा लाडका बाळ आहे. १८:१५ धर्त्री = आधार देणारी.

**कधीं ग येशील -**

१९:३ विकल्प = किल्मिष. १९:१२ बाहुल्यासाऊल्या = हीं बाळपणा-चीं स्वप्नें होय.

**राणीसाहेबांस अर्जी**

२१:२ ख्याल = विचार. २१:९ नाचीस (नाचीज़) = क्षुद्र माणूस. २१:११ नफ़री = अल्प सेवा. २१:१७ मिसाल = आज्ञापत्र, पत्र.

**प्रीतिलता**

२२:२ वात्याचक्र = वावटळ.

**तरंग**

निरनिराळ्या प्रसंगीं हे विचार स्फुरलेले आहेत. त्यांचा एकमेकांशीं फारसा संबंध आहे असें नाहीं.

२४:८ वास्तविक तुझा अपराध केला तो त्या विरहानें. मग त्याचा सूड माझ्यावर कां ?

**रुजली हृदयांत**

२६:१६ केली = क्रीडा.

**खबरदार**

तमाम पत्निवर्गास ही चेतवणी-धोक्याची सूचना-आहे.

२७:१ अवलाद = घोड्यासारख्या प्राण्याची अस्सल जात या अर्थी हा शब्द वापरतात. २७:२ रया = पर्वा. २७:६ जिद्द (ज़िद) = हट्ट. २७:१२ हमदर्द (हमदर्दी) = सहानुभूति.

**विधु उभयांवरतीं अमृतधोत उधळील**

अनुरूप व सुशील पत्नीची उपेक्षा करून दुसऱ्या एका सुविद्य व सुंदर तरुणीकडे ओढ घेणाऱ्या एका विद्वान् मित्राचें मनोगत ओळखून कवीनें त्यास हा प्रेमाचा इशारा दिला आहे.

२९:१८ चाट=लुच्चा. ३०:१३-१४. चंद्र पृथ्वीजवळ येऊन तिच्यावर आपटेल आणि त्यामुळें सृष्टीचा अंत होईल असें कांहीं खगोलशास्त्रज्ञांचें भाकित आहे. ३०:१८ अमृतधोत = अमृताचे फवारे.

## प्रेमवल्लरी

एका दुर्दैवी बालिकेच्या प्रेमळपणा पाहून कवीला ही कविता स्फुरलेली आहे.

३१:५ लालन = लाड. ३१:८ संसृतिचा हाट = संसाररूपी बाजार. ३१:१० सुख आणि दुःख हीं दोन्हीं प्रीतिपासूनच उत्पन्न होत असतात ही कवींची आवडती कल्पना येथें अभिप्रेत आहे.

## ही प्रभुची माया

प्रसूतिसमय निकट येऊन ठेपल्यानें घाबरून गेलेल्या 'माये'ला कवीनें हें पत्र धाडून धीर दिला होता.

## आई

ही कविता कवीनें आपल्या दिवंगत मातेला उद्देशून लिहिली आहे.

३३:२ वागुरा = जाळें. घन = दाट. ३३:११ मातुःश्री नासिक हाय-स्कूलमध्यें शिक्षिका असून विद्यार्थीवर्गात फार प्रिय झालेल्या होत्या.

## आज हवी होतीस

अशोकदेव व त्यांचे जेष्ट बंधु-यांचे विवाह लागोपाठ निश्चित झाले. त्यावेळीं त्यांना आपल्या मातेची आठवण झाली.

## अभिनंदन

कवींचे एक स्नेही श्री. बाबूराव आढाव यांच्या विवाहप्रसंगीं केलेलें हें अभिनंदन आहे.

## निर्मलराणी

कवींची छोटी मावसबहीण निर्मलकुमारी कश्यप उर्फ 'राणी' हिच्यावर ही कविता लिहिलेली आहे.

## रोहिणी

रोहिणी = नऊ वर्षाची बालिका. ३७:१५ पाणिपल्लव पाणि = हात. पल्लव = पानें. ३८:३ तती = ओळ, समुदाय.

## कां वृथा–

एका संपादक मित्रांनीं कवितेसाठीं लकडा लाविला असतां कवीनें त्यांस हें उत्तर धाडलें होतें. संपादक मात्र हें उत्तरच काव्य म्हणून प्रसिद्ध करून मोकळे झाले.

## अभीष्टचिंतन

प्रिं. त्र्यंबक आपाजी कुळकर्णी यांची एकसष्टी नाशीक येथें ५-९-४३ रोजीं साजरी झाली. त्या प्रसंगींचें हें अभीष्टचिंतन आहे.

४०-२ ध्वांत = अंधार. ४०-१५ मंदीर = हं. प्रा. ठा. कॉलेज.

## उपकारस्तुति

उस्मानाबादेचे रे. जॉन् मलेल्लु यांच्या ७० व्या वाढदिवसाच्या समारंभांत हें गीत गाईलें होतें. उपकारस्तुति = Thanksgiving Prayer. ४१:१ द्राक्षवेलाची शाखा–संदर्भ. बायबल योहान. ११:५. ४१:१२ यशोद = कीर्ति देणारा. ४१:१४ तवांशू = तुझे किरण. शुभाशी = शुभ आशीर्वाद. शिवाशा = पवित्र अशी आशा.

## न धाडलेले आभार

१५:८:५१ रोजीं निफाड इं. स्कूलमध्यें कवींनीं द्विवाणिचा (Ventrilouqism) प्रयोग करून दाखविला होता. त्यानंतर एका विद्यार्थिनीनें त्यांस भेटून त्यांचें हार्दिक अभिनंदन केलें. त्या शिष्येस हे 'न धाडलेले आभार' आहेत.

४२:२ नवभा = नवीन शोभा.

## आज आणि उद्यां

ही कविता त्याच विद्यार्थिनीस उद्देशून लिहिली आहे.

४३:२ आमोद = सुवास. ४३:९ मनोमुकुल = मनरूपी कळी.४३:११ आभा = कांति, तेज. ४३:१३ अनर्घ्य = बहुमोल.

## अपराध्याचें आवाहन

थट्टेथट्टेनें बोलतांना मर्यादेचें अवधान न राहून कवीनें आपल्या एका प्रिय व्यक्तीला दुखविलें होतें. तिची समजूत घालून तिला बोलती करण्यासाठीं दुसऱ्या दिवशीं त्यांनीं तिला हें पत्र धाडून तिचा रुसवा काढला.

४४:१ आवाहन = मूर्तीची प्रतिष्ठापना करितांना दैवताला केलेलें बोलावणें, हांक, appeal. ४४:४ परिहास = थट्टा.

## निरोप

४५:८ तुझ्या हास्याबरोबरच मला महान यशाचाहि लाभ झाला. ४५:१४ पुण्याई = विद्वत्ता, ज्ञान. ४६:१४ विधि = दैव.

## बालकवि

४९:१२ शाद = कोंवळें गवत.

## लहरींचें गीत

५१:९ नटिनी = नदी. ५२:१६ दिक्काल = दिशा व काळ.

## वडा

ध्येयामागें धांवणाऱ्याची भूमिका क्वचितच एखाद्याला आकलन होते.आणि ती कळूनहि त्यास त्याच्याबरोबर जाण्याचें धाडस होत नाहीं असा भावार्थ.

५४:१६ जे ब्रह्म जाणती – ब्रह्म जानाति ब्राह्मणः ∴ विद्वान्. ५५:२ मनु = काळ, युग. ५५:१४ ते बघे मुग्ध आरडा करिताती. असा अन्वय.

## कधीं येशील -

आधिव्याधींसारखीं महासंकटें जगांत आहेत म्हणूनच माणसाचें मन ईश्वराकडे धांव घेऊं शकतें.

५६:५ व्याधि = शारीरिक पीडा. आधि=मानसिक क्लेश. ५६:८ जरादेवी = म्हातारपण.

## देवाच्या राज्याचे वतनदार

प्रतिष्ठित ख्रिस्ती समाजांत हरहमेश दिसून येणारा हा एक नमुना आहे.

५७:७ नगर वसविलें डोंगरावरी = ख्रिस्तानें आपल्या शिष्यांस म्हटलें होतें, "तुम्ही जगाचा प्रकाश आहां. डोंगरावर वसलेलें नगर लपत नाहीं." ( मत्तय. ५:१४ ). ५७:१४ भक्तिमार्गीचा स्तंभदीप = तुमचा उजेड लोकांपुढें पडो. यासाठीं कीं त्यांनीं तुमचीं कामें पहावी आणि तुमच्या स्वर्गातील पित्यांचें गौरव करावें. ( मत्तय. ५:१६ ).५८:५ नास्तिक = ख्रिस्ती समाजांतील सर्वांत भारी शिवी. ५८:७ बायबलांतील दहा आज्ञा एका भल्या मोठ्या पाटीवर लिहून येणाऱ्याजाणाऱ्यांचा 'पालट' व्हावा म्हणून दाराबाहेर टांगून ठेवण्याची फॅशन आहे.

## जो तो निजा अनुसरे कुलशील धर्मा

५९:३ वृक = लांडगा.

## पोपटमैना

दुगाणी = Duet. द्वंद्वगीत. हा सुरेख मऱ्हाठी शब्द आमच्या बंधूंनीं काढला नि आम्हीं प्रचलविला.

## एदनबाग

१५ आगष्ट १९४७ रोजीं ही कविता लिहिलेली आहे. स्वतंत्र भारताला कवीनें एदनबाग म्हटलें आहे.

पहिल्या मानवाच्या जोडप्याला स्वर्गतुल्य एदनबाग विहारासाठीं दिलेला होता. पण त्याची पापाकडे प्रवृत्ति पाहून ईश्वरानें तो त्याच्याकडून परत घेतला व त्याला तेथून हांकून लावलें अशी बायबलमध्यें कथा आहे.

**खऱ्या प्रीतीची खरी हीच रीति**

६७:३ गोचर – आवाक्यांतलें, दृष्टीच्या टप्प्यांतलें. ६७:९ तोय = पाणी. रिती शुक्ति = रिकामा शिंपला. ६७:१५-१६ ख्रिस्त हा देवाचा पुत्र असून त्यानें मनुष्याच्या उद्धारासाठीं पृथ्वीवर अवतार घेतला असें बायबलचें सांगणें आहे.

**पुनरुत्थान**

मरणानंतर येशू ख्रिस्त पुन्हां जिवंत झाला होता अशी कथा आहे. याला पुनरुत्थान ( Resurrection ) असें नांव आहे.

६८:४ रसा = पृथ्वी. ६८:६ आस्य = चेहरा. ६८:११ जयी = विजयी. ६८:१२ मोह = मूर्छा. आराति = शत्रु.

**' मी ' ही मम नाहीं उरलें**

Take my life and let it be
Consecrated Lord to Thee

या सुप्रसिद्ध गीताचें हें भाषांतर आहे.

**आनंद आनंद**

शके १८६३ च्या कार्तिकी एकादशीला आळंदीस निघालेली पालखी पाहून.

**प्रार्थना**

७१:५ अक्षया = देवा. ७२:४ लास = हडळ, प्रेतें खाणारी पिशाच्चिनी.

**समाधान-शांतता**

७३:२ महाप्रभंजन = मोठें वादळ ७३:१५ तीव्रधी = बुद्धिमान्

# सूचि


| | | |
|---|---|---|
| अपराध्याचें आवाहन | | ४४ |
| अभिनंदन | प्रगति जून १९४८ | ३५ |
| अभीष्टचिंतन | | ४० |
| आई | | ३३ |
| आज आणि उद्यां | | ४३ |
| आज हवी होतीस | | ३४ |
| आनंद आनंद | | ७० |
| आशेची झुळुक | | ९ |
| इल्लिला | अशोकदेवी | ३ |
| उपकारस्तुति | | ४१ |
| उषाराणी | सह्याद्रि फेब्रुवारी १९४६ | ४८ |
| एदनबाग | | ६६ |
| कधीं ग येशील | | १९ |
| कधीं येशील | | ५६ |
| ‘कविरायाची जाया’ | | ४७ |
| कां वृथा | प्रगति जानेवारी १९५० | ३९ |
| किति खुळी सखे तूं | | १६ |
| खबरदार | | २७ |
| खऱ्या प्रीतीची खरी हीच रीती | प्रगति आगष्ट १९४८ | ६७ |
| गे नवल पाहिलें | | १२ |
| जीवन | अशोकदेवी | १ |
| जो तो निजा अनुसरे कुळशीळधर्मा | | ५९ |
| तरंग | | २३ |
| तारुण्य आणि बाल्य | अशोकदेवी | १३ |
| तृषा | अशोकदेवी | ४ |
| देवाच्या राज्याचे वतदार | | ५७ |
| न धाडलेले आभार | | ४२ |
| नाटक | | ६३ |
| निरोप | | ४५ |

| | | |
|---|---|---|
| निर्मलराणी | भगिनी डिसेंबर १९४२ | ३६ |
| पुनरुत्थान | दीपक एप्रिल १९४८ | ६८ |
| पोपटमैना | | ६० |
| प्रार्थना | सह्याद्रि सप्टेंबर १९३९: अशोकदेवी | ७१ |
| प्रीति | सह्याद्रि आगष्ट १९४७ | १७ |
| प्रीतिर्लता | | २२ |
| प्रेमवल्लरी | बालबोधमेवा जुलई १९४२ | ३१ |
| बालकवि | | ४९ |
| माया | सह्याद्रि सप्टेंबर १९४६ | १५ |
| 'मी'ही मम नाहीं उरलें | | ६९ |
| राणीसाहेबांस अर्जी | | २१ |
| रुजली हृदयांत | | २६ |
| रोहिणी | | ३७ |
| लहरींचें गीत | भगिनी मार्च १९४६ | ५१ |
| वादळ उठलें अंतर्यामीं | | १० |
| विधु उभयांवरती अमृतधोत उधळील | | २९ |
| वेडा | | ५३ |
| संजीवन | अशोकदेवी | ७५ |
| समाधान-शांतता | अशोकदेवी | ७३ |
| सिंहावलोकन | प्रगति जून १९४८ | ७६ |
| स्त्री | | ११ |
| हांक | वाङ्मयशोभा जानेवारी : नोव्हेंबर १९४६ | ५ |
| हा गौरव तुझिया दिव्यत्वाचा | | २५ |
| ही प्रगतिपथावर शिंपिल एऽच० | प्रगति फेब्रुआरी १९४८ | २ |
| ही प्रभुची माया | | ३२ |
| हुरहूर | | ७ |